श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष १ लें. ] माघ शके १८४५ [ अंक १२ वा.

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्॥



क्षणमपि सज्जन संगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥

श्री शंकराचार्य.

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.

प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रा, बी. बी. रेल्वे.

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| महात्म्यांचे अनुभव ... ... ... | ९४-१०५ |
| स्फुट विषय ... ... ... ... | ८५-९० |
| श्री साईसच्चरित ... ... ... | २३७-२५८ |


## खुलासा.

श्री साईलीलेच्या पृष्ठावर जे अंक देण्यांत येतात त्यासंबंधी कांहीं वाचकांचा गैरसमज होत आहे असें दिसतें. पृष्ठावरील अंक निरनिराळ्या विषयाला निरनिराळे दिले आहेत. हेतु हा कीं, शेवटीं पुस्तकें बांधतांना विषयवारीप्रमाणें तीं बांधवितां यावीं. या व्यवस्थेमुळें पृष्ठावरील अंकांत विषमता दिसल्यास म्हणजे २६ पृष्ठापुढें ४२ वें पृष्ठ आल्यास मधलीं २७ ते ४१ पृष्ठें आपल्याला कमी आलीं किंवा पृष्टांक चुकीचे पडले आहेत असा समज वाचकांनी करून घेऊं नये.

---

## विनंति.

श्री साईलीलेचे अंक दर महिन्यास शुद्ध ११ पर्यंत सर्व पोष्टांत पडतात व ते ग्राहकांना दर महिन्यास पौर्णिमेपर्यंत बहुतेक पोहोंचले पाहिजेत. पोष्टांत क्वचित अंक गहाळ होत असतील व त्यामुळें जर ग्राहकांनी अंक न मिळाल्याची तक्रार पौर्णिमेपर्यंत आमचेकडे केली तरच त्यांनां पुन्हां अंक पाठविण्यांत येईल. कित्येक ग्राहकांची एखादा अंक न मिळाल्याची तक्रार २।३ महिन्यानीं उशिरां येते. इतक्या उशिरां पुन्हां अंक पाठविणें अशक्य असल्यामुळें ही सूचना देणें भाग पडत आहे.

श्री साईलीला मासिकाची वार्षिक वर्गणी तीन रुपये. टपाल हांशीलसह तीन रुपये सहा आणे. व्ही पी. नें तीन रुपये आठ आणे. फुटकळ अंकास पांच आणे.

---

श्री साईनाथप्रसन्न.

( ५४ )

पार्ल्यास पंजाब्याच्या चाळींत खिमजी लालजी जोशी या नांवाचे गृहस्थ राहत होते. त्यांची मुलगी बरेच दिवस अजारी होती. एके दिवशीं ती अत्यावस्थ झाली, तेंव्हां तिची आई आमच्या घरी येऊन महाराजांची उदी घेऊन गेली. त्या उदीनें तिला तावडतोब थोडा गुण आला. पुढें खिमजी मुलीला व बायकोला घेऊन शिर्डीला गेले. मुलगी इतकी अशक्त होती कीं तिला चालवत नव्हतें. हातापायाच्या अगदी काडया झाल्या होत्या. तिला एका माणसानें उचलून महाराजांजवळ नेऊन बसविलें. महाराजांनी तिला उदी लाविली व आशिर्वाद दिला. दोन चार दिवसांत ती आपल्या पायानें चालूं लागली. मात्र उठतां बसतांना तिला त्रास होत असे. मग तिनें महाराजांकडे त्याबद्दल गाऱ्हाणें केलें व तेंव्हांपासून उठण्याबसण्याची अडचणही दूर झाली.

( ५५ )

रा. शांताराम बळवंत नाचणे डहाणूकर यांचे अनुभवः—

इ. स. १९०९ सालीं मुंबईस माझ्या वडील बंधूच्या गळ्यावर 'आपरेशन,' करविलें होतें. ऑपरेशनचें ठिकाण अगदी श्वास नाडीजवळ असल्यामुळें आम्हां सर्वांना फार काळजी वाटत होती. याप्रमाणें डहाणूस मी काळजी करीत बसलों असतां रा. हरीभाऊ मोरेश्वर फणसे मजकडे आले व मला आपण होऊनच म्हणाले कीं, श्रीसाईकृपेनें बेडापार आहे तुझ्या दादाचें ऑपरेशन चांगले झालें असें माझो मनोदेवता मला सांगत आहे. श्रीसाईबाबांची मला जी प्रथम माहिती झाली, ती याप्रमाणें व बंधूचें आपरेशन चांगलें झाल्यामुळें माझे मनांत त्यांचेविषयी बराच आदर उत्पन्न झाला. पुढें १९११ सालीं नोकरी निमित्तानें वांद्रास रा. [illegible] दाभोळकर यांचेकडे माझें जाणें झालें. त्यांचेयेथें श्रीसाई- [illegible] तसवीर मी प्रथम पाहिली व त्या तसबिरीकडे माझें चित्त [illegible]नें तेथें असलेल्या इसमास विचारल्यावरून ती तसबीर श्रीसाई-

बाबांची आहे, असें समजलें. मीही साईबाबांचा एक फोटो मिळवून त्याची उदबत्ती ओवाळून उपासना चालविली. पुढें एक वर्षानें अनायासें योग येऊन श्रीसाईबाबांचे दर्शनही झालें. १९१२ साली रेव्हिन्यु सबॉर्डिनेट परिक्षेच्या वेळीं, मी रा. शंकर बाळकृष्ण वैद्य व रा. अच्युत दाते असे बरोबर ठाण्यास गेलों. परिक्षा आटोपल्यावर परभारें शिर्डीस गेलों. कोपरगाव स्टेशनवर उतरल्यावर तांग्यासंबंधी स्टेशन मास्तरजवळ तपास करतां, मास्तरानीं आमचे प्रश्नाचा जबाब देण्याऐवजीं साईबाबांची निंदा चालविली. तिकडे लक्ष न देतां तांगा करून आम्हीं शिर्डीस तर गेलों. परंतु इतकें श्रद्धावान माझें मन पण तेंही पापग्रहानें डळमळलें. भलते भलते कुतर्क येऊं लागले. स्टेशन मास्तर म्हणाले तेंही खरें असेल का? आपण येवढें लांबून येथवर जे आलों ते अगदीं अंधश्रद्धेनेंच आलों. हे विचार माझ्या मनांत चालू असतांना श्रीसाईबाबांची स्वारी लेंडीहून परत आली. आम्हीं बाळाभाऊच्या घराचे मागें उभे होतों तिकडे बाबांची दृष्टी वळतांच इतर लोकांप्रमाणें मीही त्यांना नमस्कार घातला. मला पाहून बाबा म्हणाले अरे, मामलेदाराची रजा न घेतांच आलास काय? मी होय म्हणून उत्तर दिल्यावर ते म्हणाले असें करूं नये. ही ओळख दिल्यावर माझे मनांतील त्यांचेविषयींचा आदर वाढून श्रद्धा बसूं लागली. त्या वेळीं डहाणू येथें श्री. बी. व्ही. देव हे मामलेदार होते. मी ज्यास्त दिवस लाविल्याबद्दल त्यांनीं मला ताकीद दिली कीं, पुन्हां असें झाल्यास दंड होईल तथापि वरील कारणामुळें दिवस मोडले हें मी त्यांना कळविलें नाहीं.

आम्हीं शिर्डीस जाण्यापूर्वी मुंबईस गेलों होतों. तेथें शेजारीं हरीभाऊ फणसे मोहन बिल्डिंगमध्यें चौबळ यांचे घरीं आले होते. त्यांना एका फौजदारी केसमध्यें सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली होती, व मुंबईस ते जामीनावर सुटून अपीलाकरितां आले होते. मी शिर्डीस जात आहें असें त्यांना कळविल्यावर ते मलाच नमस्कार करून म्हणाले कीं श्रीगुरु माउलीस माझी हकीगत कळीव. मी निरपराधी असून मला निष्कारण शिक्षा झाली आहे. हा निरोप सकाळीं मी कळविल्याचे

दिलें होतें. परंतु पहाटेची काकडआरती आटोपल्यावर बाबा अति रागांत असतानांच मला म्हणाले "त्याला म्हणावें तूं अपिलांत सुटशील. काळजी करूं नको." हा जबाब मी फणशांना कळविला तेव्हां त्यांच्या अपिलाचा निकाल होऊन ते सुटले होते.

आम्ही शिर्डीहून आल्यानंतर डहाणूस आमच्या समवयस्क मित्रांपैकीं गोपाळ केशव वैद्य हे शिर्डी येथें जाऊन आले व त्यांनी आपले वडील बंधू आत्माराम केशव वैद्य यास शिर्डीस बाबांच्या दर्शनास आण्याविषयीं कळविलें. वैद्य ह्यांचे वय ते शिर्डीस गेले त्या वेळी ४२ वर्षांचें होतें व त्यांच्या कुटुंबाचें वय ३८ वर्षांचें होतें. कांहीं पिडेमुळें लग्न झाल्यापासून त्यांच्या कुटुंबानें आपल्या नवऱ्याचें तोंड पाहिलें नव्हतें. तिनें घरीं नांदावें म्हणून दोन्ही तर्फेच्या मंडळीनें शिकस्त केली परंतु तिनें आपलें माहेर सोडिलें नाहीं. परंतु शिर्डीचा प्रसादच तो त्याबाईस दिल्या बरोबर त्याच दिवशीं ती होऊन घरीं आली व धाकटे दीर (गोपाळराव) यांस म्हणाली आपलें जें घर तेंच खरें. माहेरीं कांहीं सुख नाहीं. तेव्हां त्यालाही आपल्या वहिनीच्या तोंडून वरील उद्गार ऐकून आश्चर्य वाटलें आतां हें दंपत्य सुखानें नांदत असून त्यांना मुलें झालीं आहेत.

सन १९१४ सालीं मी डहाणू येथें तिजोरी मास्तरचे काम करीत असतांना आम्ही मारुतिरायाच्या देवळाजवळ एका भाड्याच्या घरांत रहात होतों. तिथें एक रामकृष्ण बळवंत फणसे नांवाचा तलाठी रहात असे. त्याचे कांहीं कारणानें डोकें फिरलें होतें. हे गृहस्थ एक दिवस आमच्या स्वयंपाकखोलीच्या दरवाज्याजवळ येऊन उभे राहिले. मी त्याच खोलींत पूर्वाभिमुख घरच्या पंचायतनाची व श्रीसाईबाबांच्या फोटोची पूजा करीत होतों माझी त्याचेकडे नजर गेली तोंच त्यानें उडी मारून तो माझा गळा दाबूं लागला. व तोंड माझ्या कंठाजवळ आणून. मी तुझ्या नरडीचा घोट घेतों असें म्हणून चावण्याचा प्रयत्न करीत होता. त्यावेळीं आत्मसंरक्षणास साधन संवेचीं पळी मिळाली, तिचा दांडा त्याच्या तोंडांत सारला परंतु त्याच्याबरोबर माझे उजवे हाताचा आंगठा

व त्याचे जवळील बोट असें त्या इसमाचे तोंडांत त्यापळी बरोबर गेलें. त्या बरोबर त्यानें तोंड बंद केलें व करकरून चावलें. त्यामुळें आंगठयास इजा झाली व गळा दाबण्याच्या प्रयत्नामुळें त्याचे बोटाचीं नखें लागून त्या ठिकाणीं रक्त आलें, मला बराच वेळ शुध्दी नव्हती. डाक्तरी उपायानें मी शुध्दीवर आलों व मला समजलें कीं, माझा धाकटा बंधू रघुनाथ हा घरांत आल्यावर त्यानें व अखंड सौ. मातोश्रीनें मला त्याचे हाताच्या गळयास बसलेल्या बिचींतून सोडविलें. नंतर पुनः जेव्हां मी शिर्डीस गेलों तेव्हां श्रीसाईबाबांनीं त्यासंबंधी दुपारचे बैठकींत ओळख दिली. मी बसलों असतां अण्णा चिंचणीकरानां बाबा मजकडे पाहून म्हणाले कीं, अण्णा, माझी जर थोडी दिरंगाई झाली असती, तर हा गेलाच होता. वेडयानें अगदीं नरडीसच हात घातला होता. परंतु त्याला सोडविला. काय करावें आपलीं पोटचीं लेंकरें त्यानां मी न वांचविलें तर दुसरें कोण वाचवीली हे श्रीसमर्थांचे उद्‌गार ऐकून मी गहींवरून गेलों. शिर्डीस आमच्या शेजारचे चौवळांची आई कै. आनंदराव क. चौवळ यांजबरोबर शिर्डीस गेल्या होत्या. सदहू बाई पूर्वींच्या काळच्या असोन अति हुषार आहेत. त्यांनी आनंदरावास म्हटलें कीं, एक रुपयाचे पैसे सुटे असल्यास द्या; एक आठ आणे बाबांचेपुढें ठेवूं. रुपयाचे सुटे पैशांत त्यांनां २ पावल्या व अधेली मिळाली. म्हातारीनें बाबांसमोर पावली ठेवून नमस्कार करून जाऊं लागली तों लगेच बाबांनीं तिला हाक मारून म्हटलें आणखी चार आणे दक्षिणा माझ्या गरीब ब्राह्मणाची कां बुडवितेस तेवढीं देऊन टाकना तेव्हां ओशाळी पडून तिनें आणखी एक पावली बाबांस दिली.

आमच्या शंकररावाच्या मातुश्री पंढरपुरास जाण्यास निघाल्या होत्या. त्यांनीं ठरविलें कीं, शिर्डीवरून जाऊं. म्हणून त्या श्रीसाईदर्शनात गेल्या. तिथें गेल्यावर बाबा म्हणाले " घरींच परत जा " असें म्हणून त्यांना उदी घेण्यास सांगून घरीं जाण्याची परवानगी दिली. बाईनें पंढरपुराचा बेत रहीत करून उदी घेऊन शिरडीसच पंढरपूर केलें. गांवीं आल्यावर सामान ठेवून आम्हांस प्रसादाकरितां उदीची पुडी शोधूं लागल्या तों ती पुडी न सांपडतां बुक्याची पुडी पंढरपूरप्रमाणें

सुगंधी अशी मिळाली ती दाखवून म्हणाली अरे उदीची पुडी नाहीं, परंतु ह्यांत एक बुक्याची पुडी आहे, आम्ही म्हटलें तुम्ही खरेंच पंढरपूर केलेंत तुम्हांस बाबांनीं योग्य तो प्रसाद दिला.

आम्ही पुन्हां १९१५ त शिर्डीस जाण्याचें ठरविलें. त्यावेळीं बरोबर कुटुंब व कुटुंबाच्या मातोश्री आणि शंकरराव असे होतो. वाटेंत रेल्वेंत असतां रा.वासुदेव सीताराम सामंत व्हेटर्नरी व सॅनिटेशन खात्याचे इन्स्पेक्टर, हे वसई स्टेशनवर भेटले. त्यांनीं विचारल्यावरून त्यांस मी माझा मानस कळविला. त्यांनीं दोन आणे मजजवळ देऊन म्हटलें माझे तर्फेने श्रीबाबांस एक नारळ चढवून राहील त्याची कापुर उदबत्ती करा. मी पैसे घेऊन ठीक आहे असें म्हणालों परंतु त्याचे मला विस्मरण पडलें निघण्यास रजा मागितली तेव्हां बाबा म्हणाले ठीक आहे जा परंतु चितळीवरून जा. पण गरीब ब्राम्हणास २ आण्यांनीं फसवूं नकोस. तेव्हां मला आठवण झाली व मी वरील गृहस्थांनी सुचविल्याप्रमाणे दीड आण्याचा नारळ एक पैशाचा कापूर व पैशाची उदबत्ती वाहिली. तेव्हां पुन्हा रजा विचारतां हांसून म्हणाले आतां जा. ज्याचीं कामें पत्करलीं त्याचीं चोख बजावित जा नाहींपेक्षां पतकरूं नकोस.

एके वेळीं मी शीर्डीस असतांना शंकरराव दर्शनास आले. बाबांनीं त्यांचे जवळ १५ रुपये मागितले. त्यांच्याजवळ रुपये नव्हते त्यामुळें हिरमुसलेंसें तोंड करून शंकरराव गेले. पुन्हां हिरमुसलेले शंकरराव आले तेव्हां बाबा त्यांचे जवळ ३२ रुपये मागूं लागले. पुन्हा शंकरराव तोंड हिरमुसलें करून परत फिरूं लागले, म्हणून मला हांसू आलें. मी त्यांस थांबण्याची खूण केली व त्यांना म्हणालों तूं असें कां करितोस तूं सांग कीं माझेजवळ रक्कम नाहीं. उत्तर न देतां परत जातोस म्हणून बाबा पुन्हां पुन्हां मागतात. म्हणून आतां जबाब देण्याची हिंमत धरून शंकरराव आला तेव्हां बाबांनी ६४ रुपये मागितले. शंकर व मी म्हणालों "बाबा एवढी रक्कम आहे कुठें आमच्याजवळ"? बाबा म्हणाले "तर मग मागा लोकांकडून व पाठवा म्हणजे झालें" पुढें कांहीं दिवसांनीं बाबा अजारी झाले म्हणून सप्ताह सुरू केला भंडारा वगैरेकरितां मदत

म्हणून कोणास जें तुळशीपत्र देणें असेल तें देण्यांत. याचें असे डहाणूस वामन बाळकृष्ण यांस पत्र वांद्रे येथून रा. साईभक्त जी. आर. दाभोळकर ह्यांचें गेलें. वामनरावांनीं सदर्हू कामगिरी आपल्या धाकट्या भावास (रा. शंकररावास) सोपविली व त्यांनीं मला कळविलें. गांवांत आपल्या साईभक्त मंडळींस पत्र दाखविलें व वर्गणी जमा करूं लागलों ती बरोबर ६४ रुपयेच जमली म्हणून वरील शिर्डीच्या खेपेबद्दल कौतुक वाटलें.

सन १९१५ साली मी व शांताराम मोरेश्वर फणसे ३१ मार्चच्या दिवशीं सरकारी कामास जाऊन, परत येत असतांना वाटेत भयंकर जंगलांतून रात्रीं बैलगाडीनें येत होतों. डाहाणू तालुक्यातील रानशेतच्या खिंडींत आमची गाडी येतांच बैल मस्ती करूं लागले. गाडी मागें मागेंच लोटूं लागले. असें कां होत आहे म्हणून आम्ही तपासूं लागलों परंतु कांहींही कारण कळेना. एका बाजूस पहात असतां गाडीच्या पूर्व व दक्षिण बाजूस असलेल्या सडकेपलीकडे एक कडा तुटलेला असून जर कां गाडी तिकडे थोडी जरी झुकती, तरी गाडीबैलसकट आमचा कडेलोटच व्हावयाचा. इतक्यांत शांतारामानें मला समोर पहाण्यास बोट दाखविलें व माझेंही लक्ष समोर गेलें तों एक भयंकर वाघ दक्षिणेकडे तोंड व उत्तरेकडे शेपटी ठेवून गाडीकडे टवकारून बघत असलेला दिसला. इकडे मागील बाजूस उतरून गाडीच्या चाकास ठेप न दिल्यास थोडी जरी बैलांची धडपड झाली, तर गाडी कड्यावरून खालीं पडणार व उतरलें तर पुढें हा क्रूर प्राणी आपसरून तयार. फणसे हे थोडे धीट स्वभावाचे होते. त्यांनीं मला बैलांच्या पागा धरण्यास सांगितलें. माझी पागा धरून बसण्याची हिंमत होईना व एक बैल तर अगदीं पुढले पाय मोडल्यासारखें करून बसूं लागला. काय करावें हें सुचेना माझा तर घसा अगदीं कोरडा ठणठणीत पडला. परंतु पूर्व सुकृतानें त्यावेळीं श्रीगुरु काय करतील तें खरें व साईच संकट निवारोत असा विचार येतांच त्या गाडींतून, श्रीबाबांस "जय श्रीसाईबाबा हे साई बाबा धांवा!" म्हणून ओरडलों तेव्हां पंचाननाची स्वारी उठून गाडीकडेच तोंड करून आमच्या उजव्या हाताच्या बाजूनें उडी मारून, त्यानें प्रयाण केलें.

माझें एक सारखें ओरडणें चालूच होतें वाघ उजव्या बाजूस येतां-क्षणीं बैल अति घाबरले होते, बैल खूप वेगानें पळूं लागून त्या संकटांतून त्यांनीं आपली व आम्हा सर्वांची सुटका केली. त्यांनीं असें म्हणण्यापेक्षां सद्गुरू नामस्मरणानेंच हें अरिष्ट टळलें.

डहाणूस प्लेग होता म्हणून आम्ही राई नांवच्या एका खेड्यांत राहात होतों. तिथें रा.रा. रावजी सखाराम वैद्य यांचा मोरू नांवाचा लहान मुलगा एकदम भयंकर आजारी झाला, म्हणून त्यांचा वडील मुलगा माझे वडील आहेत कीं कसें हें पहाण्याकरितां आला. माझे वडील वैद्यकी करतात. वडील घरीं नव्हते म्हणून त्यास डाक्तरचे तुझी औषध द्या असें म्हटलें परंतु माझेजवळ श्रीसाई प्रसाद उदी आहे ती लावून बघा म्हणून मी त्यास उदी दिली ती लाविल्यावर मुलगा औषधावांचून हुशार झाला.

डहाणूस परशराम आपाजी नाचणें नांवांचे एक तलाटी आहेत. हे एकदां अजारी झालें. त्याचे पूर्वी ते शिर्डीस जाऊन आले होते. तें दुखणें सन्निपाताचें होतें व डाक्तरांनीं व वैद्यांनी (आमच्या वडीलांनीं सुद्धां) आशा सोडली होती. परंतु परशरामानें एक सारखे बाबांचा फोटो जवळ ठेवून तुपाचा दिवा लावण्यास सांगावें व उदबत्ती लावून ठेवण्यास आईस सांगावें, आईनेंही दिवा लावून बाबांस कळवावें कीं, मुलगा बरा होऊंदे त्याला बरा झाल्याबरोबर तुमच्या दर्शनास पाठवीन. त्या नवसास साईनाथ पावले व परशुराम बरा झाला. आतां त्याला मुलें झालीं आहेत. पूर्वीपेक्षां जास्त सुखी आहे. रा. रा. गणेश दि. वैद्य ह्यांनीं एकदां साईलीलेच्या गोष्टी चालल्या असतां, मला आपला अनुभव कळविला कीं, एकदां त्यांच्या धाकट्या मुलीच्या लग्नाच्या वरशोधनाच्या वेळीं त्यांस सकाळीं उजाडतां उजाडतां स्वप्न पडलें. त्यांत श्रीबाबांनीं आपलेकडे बोट दाखवून म्हटलें काळजी कां करितोस केशव दीक्षीत ह्यांचा मुलगा आहे. त्याचे पूर्वी ह्या मुलास त्यांनीं मुळींच पाहिलें नव्हतें. परंतु जागे झाल्यावर ते तपास करूं लागले व स्वप्नांत ह्या मुलाबरोबर आणखी एक मुलगा पाहिला परंतु त्याचें नांव गांव कळलें नव्हतें. परंतु त्यानीं मुलांचे जवळ स्वप्नांत पाहिलेल्या मुलाचें वर्णन करून नांव दीक्षीत आहे व त्याच्या बापाचें नांव केशव आहे तर

असा मुलगा कोणी पाहिला आहे की काय ? त्यांचा धाकटा मुलगा दत्तू यानें कळविलें कीं, आमच्या ऑफीसांत असा मुलगा आहे, परंतु नांवगांव वगैरेची माहिती काढून कळवीन. त्यावेळीं स्वप्नाप्रमाणें सर्व बरोबर वस्तुस्थिति होती. हे केशवराव दीक्षित रा. स. गोविंदराव दाभोळकरांचे साह्यानें नोकरीस लागून हल्लीं सरकारी पेन्शनर आहेत वैद्यांचा व गोविंदराव दाभोळकरांचाही चांगला घरोबा आहे तात्पर्य या वधूवरांचा योग श्रीच्या त्या स्वप्नाप्रमाणें जुळून त्यांचें लग्नही जमून तीं दोघें आज सुखांत नांदत आहेत.

---

( अंक १०. पा. ८५ वरून पुढें चालू. )

महाराजांनीं वरदहस्त ठेविल्यावर विन्हाडीं गेलों व श्लोक पुरे केले ते 'साईनाथसगुणोपासना' या पुस्तकांत दिले आहेत व त्या संबंधाची हकीकत श्रीसाईलीला अंक ५ मध्यें आलीच आहे.

## आत्मस्वरूप दर्शन.

आत्म्याचें स्वरूप कसें आहे, असें कोणास विचारलेंतर तें अमुक प्रकारचें आहे; असें कोणीही सांगू शकत नाहीं. कारण ती अनिर्वाच्य वस्तु आहे; पण 'स एवाधस्तात्स उपरिष्टात्स पश्चात्स पुरस्तात्स दक्षिणतः सउत्तरतः सएवेदं सर्वमिति' अर्थ 'आत्माच खाली आहे, वर आहे, पाठिमागें आहे पुढें आहे उजवीकडे, डावीकडे आत्माच आहे. हें सर्व आत्माच आहे.' असा श्रुतिमाउलींचा उपदेश आहे. ( छां. अ. ७ खं० २५ ) याप्रमाणें आत्म्याचें सर्वव्यापकत्व सांगून जरी त्याचें स्वरूप सांगण्यासारखें नाहीं तरी त्याच्या दृश्य रुपावरून मनुष्यानें त्याच्या. स्वरूपाची कल्पना करावी, याकरितां 'नतत्र सूर्योभातिन चंद्र तारकं नेमाविद्युतो भान्ति कुतोऽयमग्निः। तमेव भान्त मनुभाति सर्वं तस्यभासासर्वमिदं विभाति' अर्थ—ह्याच्याठिकाणीं सूर्य प्रकाशत नाहीं चंद्र आणि तारका प्रकाशत नाहींत, विजाप्रकाशत नाहींत, मग अग्नि कोठून ? तो प्रकाशत आहे म्हणूनच त्याच्या मागून हें

सर्व प्रकाशत आहे. त्याच्याच प्रकाशानें हें सर्व प्रकाशतें. (श्वेताश्वरोपनि. अ. ६ मं. १४ काठकोपनिषद अ. २ वल्ली २ मं. १५) अशाप्रमाणें श्रुतीनें उपदेश केला. पण हेंही स्वरूप पहावयास न मिळाल्यामुळें त्याचें यथार्थत्व वाटलें नाहीं. पण 'आदित्य त्नस्परे तसोज्योतिः पश्यंतिवारम्' अशी श्रुति वाचण्यांत आली, तिचा अर्थ 'जगाच्या पुरातन अशा बीजाची आदित्याप्रमाणें असलेली ब्रम्हरूपी ज्योती ब्रह्मज्ञानी प्रत्यक्ष पहातात.' (छां. अ. ३ खं १७ मं. ७) या वाक्यानें तिचें अयथार्थत्व नष्ट झालें. पण दुसरी एक चिंता उत्पन्न झाली कीं, आपण तर ब्रह्मनिष्ठ नाहीं मग हें स्वरूप कसलें दिसतें अशा चिंतेंत होतों. आत्म्याचीं प्रकाशमान किरणें शरीराच्या बाहेर प्रकाशित होतात. व तीं किरणें अत्यंत पुण्यवान पुरुषाच्या दृष्टीस पडतात अथवा सत्पुरुषाची कृपा झाली, तर दृष्टीस पडतात. पण तेवढी आपली योग्यता नसल्यामुळें त्या बाबासंबंधानें निराशाच करावी लागली. आतां राहिली 'सत्पुरुषाची कृपा, मग असे सत्पुरूष कोण भेटणार व त्यांची कृपा केव्हां होणार ही चिंता रात्रंदिवस लागली पण 'तुका-म्हणें नाहीं चालत तातडी ॥ प्राप्त काल घडी आल्याविण,' या संताच्यां म्हणण्याचें स्मरण झाल्यावर मनाची थोडी स्थिरता झाली. पुढें श्रीसच्चिदानंदाचे कृपेनें शिर्डीस जाणें होऊन श्रीसाईबाबांचें दर्शन झाल्यावर त्या वेळेस हेच श्रीसच्चिदानंद होत अशी भावना झाली, तेव्हां पुनः त्या आत्मस्वरूप दर्शनाच्या जिज्ञासेनें उचल खाल्ली व याबद्दल बाबांना कांहीं प्रश्न करावे असें मनांत आलें. पण अनेक वेळां बाबा 'तेली लबाड, हें तेल नही खाना घी खाना' असें म्हणत असत. पण त्याचा अर्थ मला समजेना. पुढें कांहीं-दिवसांनी माझी तळमळ शांत झाली. तेव्हां समजलेंकीं तेलाप्रमाणें तरंग उठविणारें मन लबाड आहे शांतिरूपी घृत सेवन केल्यानें लाभ होतो. व तो खरोखर झाला. एके दिवशीं श्री० बळवंतराव खापर्डे व मी प्रातःकाळीं फिरावयास गेलों होतों. त्या दिवशीं धुकें फार पडलें होतें. नुकताच सूर्योदय झाला होता. जातां जातां पश्चिमेकडे माझी सहज नजर गेली तों मी अंगुष्ठापासून ब्रह्मांडपर्यंत सूर्य किरणाच्या निरनिराळ्या रंगीत

प्रकाशांनीं व्याप्त झालों असें दिसलें माझी पडछाया लांबच लांब जमिनीवर पडून तिच्या सभोंवती दीर्घ वर्तुळाकार अंडाकृति इंद्रधनुष्याचें वेष्टन पडलें. व ज्याप्रमाणें सूर्यग्रहणाचे वेळेस सूर्याचीं किरणें बाहेर-पडून प्रभाकिरीटिमंडल उत्पन्न होतें त्याप्रमाणें त्या छायेच्या मस्तकासभोंवतीं प्रभाफाकली होती. चमत्कार पाहून त्यावेळेस तो किती आनंद झाला त्याचें वर्णन करणें मला अशक्य आहे. तो चमत्कार पहात मी उभा राहिलों. इतक्यांत बळवंतराव म्हणाले कां हो उभे कां ? मी म्हणालों तुम्ही कां उभे ? ( कारण तेही मजप्रमाणेंच चकित होऊन उभे होते ) तेव्हां त्यांनीं माझ्याप्रमाणेंच आपली हकीगत सांगितली. माझी छाया तुम्हास दिसते काय, असें मी त्यांना विचारलें तेव्हां नाहीं म्हणून त्यांनीं उत्तर दिलें. ( उन्हांत पडलेली पडछाया कोणाचीही कोणास दिसत असते. पण आम्हा उभयतांपैकीं कोणाचीही छाया व तो चमत्कार एकमेकास दिसत नव्हता. ) तेव्हां 'मेरा-मैजानु' या संत वचनाची आठवण झाली. मार्गानें जाणाऱ्या इतर मनुष्यास 'तुम्हास कांहीं दिसलें का' म्हणून विचारलें असतां, ते नकारार्थीच पाढा वाचीत. हा चमत्कार बराचवेळ पाहिल्यावर बिऱ्हाडीं आलों व दादासाहेबांना ही हकीगत सांगितली तेव्हां ते म्हणालें ही बाबांची कृपा. तुम्हास आत्मस्वरूप दाखविलें. त्यानंतर बाबाकडे गेल्यावर आमचेकडे पाहून बाबा हांसले; तेव्हां दादासाहेबांचें म्हणणें खरें वाटून ही बाबांचीच कृपा अशी खात्री झाली. तरी हा धुक्यांतील सृष्टिचमत्कार असावा अशी शंका घेऊन प्रत्येकवेळचे धुक्यांत हा चमत्कार पहाण्याकरितां बळवंतरावाला सांगून मीही त्या प्रयत्नांत राहिलों. मला तर तो चमत्कार दिसलाच नाहीं, पण बळवंतराव यांना विचारलें असतां ते म्हणाले, मी पुष्कळवेळ धुक्यांत उभे राहून पाहिलें, पण शिर्डीप्रमाणें चमत्कार एकही वेळेस दिसला नाहीं. सारांश श्रीसच्चिदानंद साईबाबांनींच हें आत्मस्वरूप दर्शन दिलें. असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं व 'सत्य संकल्पाचा दाता भगवान् सर्व करी पूर्ण मनोरथ' ही संतोक्तिच असून बाबाच भक्तांच्या सर्व इच्छा पूर्ण करितात हें खास.

के. के. भीष्म

## श्रीसद्गुरु साईनाथ प्रसन्न.

पार्ले ता. ३१. ८. १८

एकदां मी शिर्डीस असताना मुंबईचें पत्र आलें त्यांत लिहिलें होतें कीं नानासाहेब करंवेल्करांचे कुटुंब व त्यांचे बंधु बाळुकाका फार अजारी आहेत. पत्रांतील मजकूर महाराजांचे चरणीं निवेदन केला तेव्हां बाळूकाकांबद्दल महाराज म्हणाले तो चांगला होईल. नानासाहेबांचे बायकोबद्दल महाराजांनीं विचारलें ती आली आहे का ? नाहीं असें उत्तर दिलें व तिला बोलवायची का ? असें विचारलें. महाराज होय म्हणाले. पुढें कळलें कीं नानासाहेब यांचें कुटुंब वारलें व बाळुकाका बरे झाले.

पार्ले ता. १६. ९. १८

शिर्डीचे माधवराव देशपांडे यांना एकदा मूळव्याध झाली. त्यांनीं महाराजाना सांगितलें. महाराज म्हणाले आपण दुपारीं औषध करूं. त्याप्रमाणें दुपारीं महाराजांनी सोनामुखीचा काढा केला व त्यांतला थोडा माधवरावांना दिला. त्याबरोबर मूळव्याध एकदम बंद झाली. पुढें दोन वर्षांनीं त्यांना पुन्हा मूळव्याध झाली. महाराजांनीं पूर्वी काढा दिला होता म्हणून माधवरावांनीं आपल्याच विचारानें काढा घरीं तयार करून तो घेतला. त्यापासून बरें न वाटतां मूळव्याध जास्त भडकली. पुढें कांहीं दिवसांनीं महाराजांचे कृपेनें बंद झाली. सारांश गुण औषधांत नसून महाराजांच्या हातांत व आशीर्वादांत आहे.

श्रीसमर्थ ज्ञानेश्वर महाराजांचा अमृतानुभव हा ग्रंथ प्रसिद्धच आहे पण अति दुर्बोध असल्यामुळें फार थोड्या लोकांच्या वाचनांत आहे. त्याजवर ओवीबद्ध विस्तृत टीका करून साधारण जनांना तो सुबोध करावा असें दास गणूंच्या मनांत आलें. हा आपला विचार त्यांनीं साताराचे प्रसिद्ध दादा महाराज म्हावी यांस कळविला. त्यावर दादा महाराजांनीं त्यांना मोडा घातला. ते म्हणाले टीका करण्यापूर्वी मूळ ग्रंथ तुम्हाला उत्तम तज्ञाकडून चांगला समजून घ्यावा लागेल. कांहीं महिने तुम्ही आमच्या जवळ राहून

ग्रंथ समजून घ्या आणि मग टीका करा." दादा महाराजांचे ज्ञानेश्वर महाराजांचें ग्रंथांचें परिशीलन उत्तम आहे अशी त्यांची आख्या आहे. दास गणू म्हणाले " मी टीका करावी अशी बाबांची इच्छा असली तर तेच मला बुद्धियोग देऊन ग्रंथ समजून देतील. मी दुसऱ्या कोणाजवळ शिकावयास जाणार नाहीं." दादा महाराजांना हें दास गणूंचें म्हणणें पटलें नाहीं तरी पण त्यांनींही दास गणूंचा हेतु सिद्धीस नेण्याविषयीं बाबांची प्रार्थना केली व दास गणूंनीं स्वतः ग्रंथ वाचून टीका लिहिण्याची सुरुवात केली. दोन अध्यायावर टीका झाल्यानंतर दादा महाराज दास गणूस पुनः भेटले आणि ग्रंथाविषयीं विचारपूस केली. दासगणूंनीं लिहिलेले अध्याय वाचून दाखविले. ते ऐकून दादा महाराज सद्गदित झाले व म्हणाले" बाबा खरे समर्थ आहेत व त्यांची तुमच्यावर कृपा आहे म्हणूनच अशी टीका तुमच्या हातून होत आहे. तुम्हाला दुसऱ्या कोणाची मदत घेण्याचें कारण नाहीं".

पार्ले ता.२०. ९. १८

माझ्या एका स्नेह्याचे मुलीला गर्भार असतांना वेड लागलें होतें. एक सारखी रात्रंदिवस बडबड करीत असे. घरांतलें सामान इकडे तिकडे फेकीत असे. खिडकीवाटे बाहेरही टाकी. तिचे महिने भरले तेव्हां सगळ्यांना मोठी काळजी पडली. कारण डाक्टरांनीं सांगितलें होतें कीं तिचें बाळंतपण फार जड जाईल. डाक्टरांनीं एका हुशार सुईणीचीही व्यवस्था करून ठेविली होती. महाराजांनीं चांगला आशिर्वाद दिला होता व तो आशीर्वादच खरोखरी उपयोगी पडला. एके दिवशीं सकाळीं तिचें पोट दुखुं लागले व एक माणूस डाक्टराकडे व एक माणूस समोर तिची मोठी बहीण राहते तिला बोलावयला गेला. ती तावडतोब आली व त्या मुलीजवळ बसली. बसल्याबरोबर मुलीचा गर्भ बाहेर पडला तो थोरल्या बहिणीच्या हातावरच पडला. कोणत्याही तऱ्हेचा त्रास झाला नाहीं. बाळंत झाल्यावर सुमारें अर्ध्या तासानें डाक्टर आले अर्थात् ते येण्याचे पूर्वीच त्यांना बाळंत झाल्याची खबर पोहोचली.

गुलबर्ग्याहून रा. रा. जी. वी. मानकर यांचे कडून रा. रा. बाबा साहेब तर्खड यांना आलेल्या पत्रांतील उतारा:—

येथील ३७५ हार्स पावरचें "डीझल एन्जिन" उभें करीत असतां व त्याची "फ्लाय पुली" जी सुमारें १२ टन वजनाची होती, ती "क्रेन" मार्फत उचलीत असतां "क्रेन" नाजूक असल्याकारणानें थांकली व कुर्र्र असा आवाज झाला. त्यामुळें माझें काळीज चर्र्र झालें व सर्वांगाला दरदरून घाम सुटला. "क्रेन" तुटली असती तर कित्येक माणसें दगावलीं असतीं. मी तात्काळ श्रीसाईबाबांस मोठ्यानें हांक मारली, व त्यांचा धांवा करून 'बाबा आतां सर्वांना संभाळा' म्हणून ओरडलों. एक क्षण गेला नसेल तोंच धूपाचा व गुलाबांच्या फुलांचा सुगंध चोहींकडे पसरला व मजूर लोक एकमेकांना फुलें कोणी आणलीं व धूप कोण जाळीत आहे, वगैरे विचारूं लागले. ह्या बाबांच्या साक्षात्कारानें माझें अंतःकरण भडभडून आलें, डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहूं लागल्या व मी तात्काळ मोठ्यानें ओरडलों कीं "हा बेस" (म्हणजे उचला) माझे बाबा आले." मजूर वर्ग बारीतून पाहूं लागला. बाबा (म्हणजे माझे पिताश्री) कुठे आहेत ते. मी आनंदानें हांसलों. व म्हणालों बाबा म्हणजे श्री साईबाबा. गुलाबांच्या फुलांचा घमघमाट व धूप जळल्याचा सुगंध जो सुटला आहे, हा त्यांचा साक्षात चमत्कार.

श्रीसाईबाबांच्या कृपेनें 'फ्लाय पुली' कांहीं अडचण न येतां उचलली गेली व श्री सद्गुरूनीं माझ्यावरील अपेश दूर केलें.

रा० रा० गणपतराव नरके एम. ए. यांचे रा० रा० काकासाहेब दीक्षित यांस पत्र:—

शिरडी- २ मार्च १९१८

ति. ॥ काकासाहेब यांस साष्टांग नमस्कार. आपलें ता. १ चें कार्ड पावलें. आपला नमस्कार श्रींना ता. ३१ रोजी सायंकाळीं डॉ. पिल्ले मार्फत कळविला बाबा "बरें आहे" इतकेंच म्हणाले. नवल विशेष कांहीं नाहीं.

बाबांची प्रकृती चांगली आहे. काल व आज सकाळीं बाबांनी मुद्दाम बर्फी आणून वाटली. घरीं १० वाजतां परत आल्यावर वाड्यांत आम्हीं त्याची चर्चा करीत होतों तितक्यांत कोणाचे हातात ठोसरांची निमंत्रण पत्रिका पडली. झालें. मंडळी म्हणूं लागली कीं बाबांची तिकडे ठोसरांकडे स्थापना झाली त्याचाच हा प्रसाद वाटला. काल दुपारीं वझ्यांचा सत्यनारायण झाला. बाबांनीं ह्याकरितां वझ्यांना रु २५ स्वत:जवळचे दिले होते. दुपारीं सर्व मंडळींना बाबासमोर निमंत्रण करण्यांत आलें होतें. पूजा मर खांबाजवळ झाली. दीक्षित चौरंगाजवळ वर बसून पोथी वाचीत होते. बाबासमोर समई जळत होती.आजूबाजूस सर्व मंडळी पोथी ऐकावयाला म्हणून बसली होती. पण बाबांकडेच बघत होती. न्याहारीचे वेळेपर्यंत ५ वा अध्याय संपत आला. तितक्यांत न्याहारी आल्यावर बाबांनी पूजेचें व नैवेद्य सावकाश रीतीनें खालीं नेण्यास सांगितलें. नैवेद्य माझेकरितां ठेवा आणि सर्वांस वाटा असें म्हणाले. बाबांचे न्याहारीनंतर वझ्यांनी आरती केली. फार आनंद झाला. नंतर बाबांनींही स्वत: शेंगादाणे आणून वाटले व डाळ आणून ती भिजत ठेविली. रा. रा. खडक्याना बाबा मशिदींत जेऊं घालीत असतात. कळावें लोभ असावा ही विज्ञापना. काकांना साष्टांग नमस्कार.

आपला नम्र

गणपती नरके

बर्फी चालू आहे. गंगाराम हलवायाचे मुलापासूनच घेतात.

रा. रा. दामोदर घन:शाम उर्फ अण्णा चिंचणीकर हे श्रीसाईबाबांचे भक्त होते त्यांनी आपल्या इस्टेटीचें मृत्यूपत्र केलेलें होते. त्या मृत्यूपत्राची नक्कल.

श्रीसद्गुरु साईनाथ प्रसन्न.

मी दामोदर घन:शाम बाबरे राहाणार चिंचणी तालुके डाहाणू जिल्हा ठाणे आज वस्ती विरले पारलें हें माझें अखेरचें मृत्युपत्र करून ठेवीत आहें.

१ रा. नारायण महादेव ठोसर रहाणार पार्ले, २ रा. ठोसर यांनी पार्ल्यांत एक मारुतीचें देऊळ बांधलें असून तें सध्यां साई हनुमान नांवानें प्रसिद्ध आहे.

मी आजपर्यंत जीं मृत्युपत्रें केलीं असतील तीं या लेखानें रद्द करीत आहें व माझ्या पश्चात् माझे एकंदर इस्टेटीची व्यवस्था खालीं लिहिल्याप्रमाणें करीत आहें.

या मृत्युपत्राचे उर्फ व्यवस्थापत्राचे पंच म्हणजे एक्झीक्युटर मी खालील गृहस्थांस नेमतों.

श्रीयुत हरि सीताराम दीक्षित सॉलीसीटर
" गोविंद रघुनाथ दाभोळकर
" अच्युत नारायण खरे वकील
" मोरेश्वर विश्वनाथ प्रधान
" लक्ष्मण गणेश महाजनी

माझी स्थावर मिळकत खरीफ वरकस बागायत जमिनी मौजे चिंचणी तालुके डाहाणु मौजे नेवाळें तालुके माहिम मौजे वेढे तालुके माहिम जिल्हा ठाणें येथें आहे. त्यापैकीं कांहीं मिळकत माझे कबज्यांत आहे व कांहींच्या संबंधानें कोर्टांत दावे चालू आहेत. ती सर्व मिळकत व माझी एकंदर जंगम मिळकत सुद्धां श्रीसद्गुरु सांईबाबा यांचेप्रीत्यर्थच उपयोगास यावी अशी कांहीं वर्षांपासून माझी उत्कट इच्छा आहे. त्यांच्याच कृपेनें मला व माझे स्त्रियेला त्यांचे चरणाजवळ कांहीं वर्षे वास करण्याचा सुयोग आला व आमची उभयतांची त्यांच्यावर पूर्ण श्रद्धा बसली. माझी स्त्री गेल्या फाल्गुन वद्य प्रतीपदेला वारली. मरण्याचे पूर्वी तिनें आग्रहपूर्वक विनंती केली कीं, श्रीसाई बाबा महाराजांचें मंदीर चिंचणीस बांधावें. त्याप्रमाणें मी मंदीर बांधण्याची सुरवात केली आहे, तें माझे हयातींत पुरें न झाल्यास वर लिहिलेल्या पंचांनीं पुरें करावें व तेथें श्रीसाईबाबा महाराजांच्या मूर्तीची स्थापना करावी व नित्याच्या पूजेअर्चेची व नैमित्तिक पूजेची व्यवस्था करावी व या खर्चासाठीं माझ्या इस्टेटीच्या उत्पन्नांतून सालींना रुपये तीनशें खर्च करावेत व बाकी जें उत्पन्न राहील त्यांतून सरकार देणें सावकाराचा म्हणजे

मनोरदास लालदास याचे कर्जाचा हप्ता चारशें रुपयांचा देऊन जें उत्पन्न राहील त्यांतून श्रीक्षेत्र शिरडी येथील श्री साईबाबा महाराजांच्या समाधीचे जे व्यवस्थापक असतील त्यांचे स्वाधीन करीत जावें. सावकाराचें देणें फिटल्यानंतर जें माझें निव्वळ उत्पन्न राहील त्यांतील ½ हिस्सा पंचांनी चिंचणी येथील सदरहू मंदीराप्रीत्यर्थ खर्च करावा व बाकीचा ½ हिस्सा शिरडी येथील ~~व्यवस्थापकांस पाठवून द्यावा~~. जंगम मिळकतीपैकीं चिंचणी येथील सदरहू मंदीरासाठीं जितकी रक्कम माझ्या पंचांना योग्य वाटेल तितकी त्यांनीं ठेवावी व बाकी राहीलीची व्यवस्था पंचांस योग्य वाटेल तशी करावी. पण तिचा उपयोग श्रीसाईबाबा महाराजांचेप्रीत्यर्थच झाला पाहिजे. त्यापैकीं शेतीसाठीं लागवडीस उपयोगाकरितां अवश्य लागेल ती ठेवावी.

चिंचणी येथें मंदिराचे जवळच श्री साईबाबा महाराजांचे भक्त मंडळांचे सोईसाठीं एक घर बांधण्याचा माझा विचार आहे. तें जर माझ्या हयातींत बांधलें गेलें नाहीं तर तें पंचांनीं माझे इष्टेटीचे उत्पन्नांतून खर्च करून बांधून उपयोगास आणणें त्याची सर्व व्यवस्था माझे पंचांनी करावी. तें घर सदरील मंदीराचाच भाग समजला जाईल व तें घर व सदर मंदीर हीं दोन्ही खाजगत मिळकत समजलीं जातील व त्यासंबंधानें व्यवस्थेचे सर्व हक्क माझे पंचांस मी देतों. व त्यांना घराचे व मंदीराचे ट्रस्टीनेमितों त्या ट्रस्टीपैकीं कोणाची जागा रिकामी झाल्यास बाकीच्या ट्रस्टींनीं ती भरावी.

किरकोळ लोकांचें देणें आहे त्याची व्यवस्था पंचांनीं करावी.

हें मृत्युपत्र मी माझे राजीखुषीनें व अक्कल हुशारीनें लिहून ठेविलें आहे. तारिख १० जुलई सन १९१९

साक्ष — सही

१ माधव बळवंत देशपांडे — दामोदर घनःशाम बाबरे

मु॥ पारलें दा॥ खु॥ — दस्तूर खुद हस्ते खुद

Sadashiv Sitaram Dikshit, Parla

## सौ. रंगूबाई विरचित

### पद नं. ११

साईनाथांसी पाहूं जाऊं चला शिरडी ॥ झडकरी जाऊं चल शिरडी ॥धृ०॥ ध्यास तयांचा लागला चित्ता ॥ नाहीं सुचत कांहीं ॥ झडकरी ॥ १ ॥ कोपर गांवीं तांगा करूनी ॥ न्हाऊं गोदातीरीं ॥ झड० ॥ २ ॥ आनंदानें दर्शन घेऊं ॥ लीन तत्पदीं होऊं ॥ झड० ॥ ३ ॥ हेतु मनींचे पुरवितील ते ॥ भाव ठेऊं पायीं ॥ झडकरी ॥ ४ ॥ मन हें धांवत स्वस्थ न राहत ॥ काय करूं पाहीं ॥ झडकरी ॥ ५ ॥

### पद नं. १२

जाऊं चला आरतीला ॥ नमुया श्रीगुरु साईपदाला ॥ जाऊं ॥धृ०॥ जन हे येती पूजन करिती । सुमन हार ते गळां घालिती ॥ मस्तक साईपदीं नमवीती । करुनी प्रार्थनेला ॥ घेऊनी जाती प्रसादाला जाऊं ॥१॥ हळू हळू बोलती भाषा घाटी । उकले ज्याची त्याला गांठी ॥ इतरां वादती फोलची गोष्टी ॥ मम चित्तभ्रम हरला ॥ पाहुनी साई सत्स्वरुपाला ॥ जा० च० आ० ॥२॥ आला मेघा करुयां आरती ॥ छत्र रुप्याचें धरुं साईवरती ॥ उभे भालदार चवरी ढाळिती ॥ तास म्हणाणे ऐका · जय जय जयगुरु साईविलोका ॥ जा० च० आ० ॥ ३ ॥

## ह. भ. प. दासगणू यांचे शिष्य दामू अण्णा यांचें

### पद नं. १३

असे ब्रम्हरुप साईनाथ माझा गुरुवर ॥ प्रांत दुजा वाटे दैदीप्यमान दिनकर ॥ धृ ॥ गाणार वाजवीणार साई प्रियकर ॥ तसा ऐकणार असे तोचि साच गुरुवर ॥ १ ॥ करिं धरुनि मदिय तंबुरा गाई सुस्वर ॥ परि मधें कसारे नाकळे होतो बदूसुर ॥ २ ॥ नको देऊं किमपि बदूसुरा ठाय गुरुमाई ॥ श्री साई ॥ किती वानु तुजसि मी पापि अतिरे पामर ॥ गणुछात्र विनवि मम दुजा भाव करि दुर ॥ ३ ॥ असे० ॥

### पद नं. १४

दर्शन दे साइबाबा ॥ सकल दुरित मम हरुनि त्वरित दर्शन ॥धृ॥ काम मोह मद लोभ थरथरा ॥ कांपति तुज पाहुनि नटवरा ॥ तुझिया चरणीं रिपु करिती नमन ॥ दर्शन ॥ १ ॥ त्वदिय समुहीं मी पापि म्हणून ॥ नाम तुजसि लाधलें पतित पावन ॥ मग अभंग चरणिं ध्याया करिना कसर ॥ २ ॥ अज्ञ तुझे लेकरु ना कदा ॥ टाकी भवीं भो घेई तव पदा ॥ सतत तुजसीं गणू छात्र शरण ॥ दर्शन ॥ ३ ॥

## दासगणुकृत

(भूपाळी.)

झाला बालभोग आतां उघडावें द्वार ।
गरुडपारीं आले देवा वैष्ण डिंगर ॥
गहिनीनाथाचा तो शिष्य निवृत्ति दातार ।
घाली दंडवता तुम्हां जोडुनियां कर ॥
तुझिया कृपें ज्यानीं देवा रेडा बोलविला ।
प्रवरेच्या तटीं ग्रंथ ज्ञानेश्वरि केला ॥
तें हे वैष्णवांचें गुरु श्री ज्ञानेश्वरि ।
चांगा नामा जनी कान्हो नरहरि सोनार ॥
महाद्वारीं राहुन चोखा करीत जोहार ।
मंगळवेढ्याहुनी आले तव ठाणेदार ॥
कुलाल बंका राका वंका मुक्ता सोपान ।
देवगिरीचे सुभे आले पंत जनार्दन ॥
पैठणींचे आले भसटी भानुदास देवा ।
नामयाचा गुरु खेचर विसोबा बरवा ॥
ज्याचे सदनीं देवा तुम्ही पाणक्या झालां ।
गोदावरीचा साधू तो हा एकनाथ आला ॥
डोईस गोफण हातांत खुरपें मणि तव कंठीचा ।
आला तो सांवता माळी अरणभेंडीचा ॥
भवाब्धींचें केवळ तारूं श्रीदेहूकर ।
तुकोबा ते आले आतां कांहो उशीर ॥
ज्याचे साठीं आपण बसलां राखण शेताला ।
धामणगांवचा तो पाटिल बोधला आला ॥
आवड देवा तुम्हां बहु निंबराजाची ।
येव इच्छिताती लाही ज्याच्या काल्याची ॥
संतचरित्रीं ज्याचा प्रेमा जडला अनिवार ।
तो हा महीपती आला साधू ताहाराबादकर ॥
मिया शेखमहंमद साधू पवार संतोबा ।
आधुनिक संतांसह आले शिर्डीचे बाबा ॥
या अरुणकाळीं सेजे तुम्हीं आळस मांडीलें ।
दासगणु म्हणे उघडा आतां द्वार विठ्ठले ॥ १० ॥

# अध्याय १४ वा.

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यैनमः । श्रीगुरुभ्योनमः ।
श्रीकुलदेवतायैनमः । श्रीसीतारामचंद्राभ्यांनमः ।
श्रीसद्गुरूसाईनाथायनमः ॥

जयसाईनाथा संतवरा । जयजय दयाळा गुणगंभीरा ॥
जयनिर्विकारा परात्परा । जयजय अपारा निरवद्या ॥ १ ॥
ठेवूनि अलक्ष्यीं दृष्टी । निजभक्तार्थ दया पोटीं ॥
नानामिषें भक्तांस भेटी । देऊनि संकटीं तारिसी ॥ २ ॥
करावया दीनोद्धार । हाही एक लीलावतार ॥
भक्त दुर्वासना दुर्धर । दुष्ट निशाचर वधावया ॥ ३ ॥
सद्भावें दर्शना जे जे आले । ते ते स्वानंदरस प्याले ॥
अंतरीं आनंद निर्भर धाले । डोलूं लागले प्रेमसुखें ॥ ४ ॥
एवंगुण साईसमर्थ । हीनदीन मी अतिविनीत ॥
तयाचिया चरणाप्रत । साष्टांग प्रणिपात दीनाचा ॥ ५ ॥
आतां पूर्व कथानुसंधान । कृष्ण श्वान भक्षितां दध्योदन ॥
जाहलें हिमज्वराचें निरसन । कथा निवेदन जाहली ॥ ६ ॥
दुर्धर वाखा आणि मोडसी । अंगुली तर्जन तरण मात्रेसीं ॥
भर्जित भुईमूग सेवावयासी । देऊनि नाहींशी जाहलीं ॥ ७ ॥

तैसाच एकाचा पोटशूळ। एकाचा कर्णरोग समूळ ॥
एकाचा क्षयरोग महाप्रबळ। कैसा निर्दळला दर्शनें ॥ ८ ॥

कैसे श्रीसाई कृपेकरून। भीमाजी जाहले सुखसंपन्न ॥
साईलागीं कृतज्ञता पूर्ण। चरणीं शरण अखंड ॥ ९ ॥

तैसाच अभिनव हाही प्रकार। हाही अपूर्व चमत्कार ॥
श्रोतियां श्रवणार्थीं बहु आदर। जाणोनि सादर करीतसें॥१०॥

श्रोतीं नसतां सावधान। कैसें येईल वक्त्यासीं स्फुरण ॥
कैसें गुणा चढेल कथन। कैसें तें रसपूर्ण होईल ॥ ११ ॥

वक्ता काय करील कथन। सर्वथैव तो श्रोतया आधीन ॥
श्रोतेच तयाचें अवलंबन। रसवर्धन तेणेनी ॥ १२ ॥

आधींच हें संत चरित्र। स्वभावेंच गोड बाह्याभ्यंतर ॥
गोड संतांचे आहार विहार। सहजो द्गारही गोड ॥ १३ ॥

चरित्र नव्हे हें स्वानंद जीवन। साई महाराज दयाघन ॥
प्रेमें भक्तालागून। वर्षले साधन निजस्मरणा ॥ १४ ॥

गोष्टी सांगत प्रवृत्तीच्या। मार्गास लावीत निवृत्तीच्या ॥
ऐशा प्रपंच परमार्थाच्या। सत्पुरुषांच्या या कथा ॥ १५ ॥

हेतू तरी हेच असावे। कीं संसारीं सुखें वर्तावें ॥
परी नित्य सावध रहावें। सार्थक करावें देहाचें ॥ १६ ॥

अनंत पुण्याईच्या बळें। अवचटें जीवा नरदेह मिळे ॥
त्यांतही परमार्थ जयां आकळे। भाग्यें आगळे ते एक ॥ १७ ॥

तेथेंही जो करीना सार्थक। जन्मला भूभार तो निरर्थक ॥
पशूहून काय अधिक। जगण्याचें सुख तयाला ॥ १८ ॥

आहार निद्रा भय मैथून । यांहून कांहीं न जाणे जो आन ॥
तो नर केवळ पशु समान । पुच्छ विषाण विरहीत ॥ १९ ॥
काय या नर जन्माची महती । एणेंच साधेल भगवत भक्ती ॥
पायीं लागतील चारी मुक्ती । निजात्म प्राप्ती येणेंच ॥ २० ॥
मेघमंडळीं विद्युल्लेखा । संसार हा चंचल तिज सारिखा ॥
एथें कालाहि ग्रस्त लोकां । सुखाची घटका दुर्मिळ ॥ २१ ॥
माता पिता भगिनी भ्राता । दारा पुत्र सुता चुलता ॥
नदी प्रवाहीं काष्टें वाहतां । एकत्र मिळतात तैसे हे ॥ २२ ॥
दिसलीं क्षणएक एकवट । लाटेसरसी फाटाफूट ॥
होऊनि पडे जैं ताटातूट । जुळेना तो घाट पुनश्च ॥ २३ ॥
साधिलें न आत्महित जनीं । व्यर्थ शिणविली तयानें जननी ॥
लागल्याविण संतांचे चरणीं । होईल हानी जन्माची ॥ २४ ॥
प्राणी जेव्हां जन्मास आला । तेव्हांच मृत्यू पंथा लागला ॥
मग आज उद्यां कीं परवांला । विश्वासला तो नर फसला ॥ २५ ॥
ठेवावें या मरणाचें स्मरण । देह केवळ काळाचें वैरण ॥
ऐसें या प्रपंचाचें लक्षण । सावधान असावें ॥ २६ ॥
व्यवहारीं पाऊल ठेवितां चौकस । परमार्थे पावेल अभ्यास ॥
म्हणूनि प्रपंचीं नसावा आळस । पुरुषार्थी उदास असूं नये ॥ २७ ॥
प्रेमें साई कथा परिसती । तयांस होईल निश्रेयस प्राप्ती ॥
साई चरणीं वाढेल भक्ति । सुख संवित्ति लाधेल ॥ २८ ॥
जयांस साईचें प्रेम पूर्ण । तयांस हें कथांचें सांठवण ॥
देईल पदोपदीं आठवण । साई चरण पंकजांची ॥ २९ ॥

आहार निद्रा भय मैथून । यांहून कांहीं न जाणे जो आन ॥
तो नर केवळ पशु समान । पुच्छ विषाण विरहीत ॥ १९ ॥
काय या नर जन्माची महती । एणेंच साधेल भगवत भक्ती ॥
पायीं लागतील चारी मुक्ती । निजात्म प्राप्ती येणेंच ॥ २० ॥
मेघमंडळीं विद्युल्लेखा । संसार हा चंचल तिज सारिखा ॥
एथें कालाहि ग्रस्त लोकां । सुखाची घटका दुर्मिळ ॥ २१ ॥
माता पिता भगिनी भ्राता । दारा पुत्र सुता चुलता ॥
नदी प्रवाहीं काष्टें वाहतां । एकत्र मिळतात तैसे हे ॥ २२ ॥
दिसलीं क्षणएक एकवट । लाटेसरसी फाटाफूट ॥
होऊनि पडे जें ताटातूट । जुळेना तो घाट पुनश्च ॥ २३ ॥
साधिलें न आत्महित जनीं । व्यर्थ शिणविली तयानें जननी ॥
लागल्याविण संतांचे चरणीं । होईल हानी जन्माची ॥ २४ ॥
प्राणी जेव्हां जन्मास आला । तेव्हांच मृत्यू पंथा लागला ॥
मग आज उद्यां कीं परवांला । विश्वासला तो नर फसला ॥ २५ ॥
ठेवावें या मरणाचें स्मरण । देह केवळ काळाचें वैरण ॥
ऐसें ह्या प्रपंचाचें लक्षण । सावधान असावें ॥ २६ ॥
व्यवहारीं पाऊल ठेवितां चौकस । परमार्थे पावेल अप्रयास ॥
म्हणूनि प्रपंचीं नसावा आळस । पुरुषार्थीं उदास असूं नये ॥ २७ ॥
प्रेमें साई कथा परिसती । तयांस होईल निश्रेयस प्राप्ती ॥
साई चरणीं वाढेल भक्ति । सुख संवित्ति लाधेल ॥ २८ ॥
जयांस साईचें प्रेम पूर्ण । तयांस हें कथांचें सांठवण ॥
देईल पदोपदीं आठवण । साई चरण पंकजांची ॥ २९ ॥

निःशब्दाचें शब्दें कथन । अतींद्रियांचें इंद्रियें सेवन ॥
कितीही करा हें कथामृत पान । पूर्ण समाधान दुर्लभ ॥ ३० ॥

अतर्क्य संतांचें विंदान । अनिर्वचनीय तन्महिमान ॥
तयाचें वाचें पूर्ण कथन । कराया कवण समर्थ ॥ ३१ ॥

नित्य पडतां या कथाश्रवणीं । साई दिसेल नित्य नयनीं ॥
मनीं ध्यानीं दिवा रजनी । स्मरणीं चिंतनीं राहील ॥ ३२ ॥

दिसूं लागेल जागृति स्वप्नीं । आसनीं शयनीं आणि भोजनीं ॥
सर्वेही येईल गमना गमनीं । जनीं, वनीं निरंतर ॥ ३३ ॥

ऐसा येतां निदिध्यासनीं । मन पावेल स्थिति उन्मनीं ॥
ऐसें होऊं लागतां अनुदिनी । चित्त चैतन्यीं समरसेल ॥ ३४ ॥

आतां पुढील कथेची संगती । असे जी कथिली पूर्वाध्यायांतीं ॥
करूंतीचा उपक्रम संप्रती । सादर श्रोतीं होईजे ॥ ३५ ॥

भाव भक्तीची शिरापुरी । कितीही खा सदां अपूरी ॥
जरी आकंठ सेविली तरी तृप्ती न परिपूर्ण कधींही ॥ ३६ ॥

असो आतां हे दुसरी कथा । श्रोतां आपण सादर परिसतां ॥
संत दर्शन सार्थकता । होईल दृढता मनाची ॥ ३७ ॥

बाबा न बाह्यतः कांहींच करीत । स्थान सोडून कोठें न जात ॥
परी बसल्या स्थळीं सर्व जाणत । अनुभव देत सकळां जनां ॥३८॥

जें सत्तत्व निजपिंडीं । तेंच कीं अखिल ब्रह्मांडीं ॥
कायेची करोनि कुरवंडी । अखंडीत अवलोका ॥ ३९ ॥

त्या सत्तत्वासि जो शरण । सर्वांसाठीं तया एकत्व जाण ॥
नानात्वाचें केलिया धारण । जन्म मरण परंपरा ॥ ४० ॥

नानात्व स्थापणारी बुद्धि । अविद्याच जाणावी विशुद्धी ॥
गुर्वागमें चित्तशुद्धि । स्वरूप स्थिति तेणेनी ॥ ४१ ॥

अविद्येपासाव निवृत्ति । तीच एकत्वाची प्राप्ती ॥
अणुमात्र असतां भेद चित्तीं । अनन्य स्थिति ती कैंची ॥ ४२ ॥

ब्रह्मादि स्थावरांत । जें जें उपाधि समन्वित ॥
अविवेकियां अब्रह्मवत । ओत प्रोत ब्रम्ह तें ॥ ४३ ॥

तें सकल विज्ञान घनस्वभाव । संसार धर्मा जेथ अभाव ॥
नामरूपांचा पुसिला ठाव । निरवयव ब्रह्मतें ॥ ४४ ॥

उपाधि स्वभाव भेदें । अविद्या मोहादि प्रमादें ॥
नानात्वीं हें चित्त क्षोभे । एकत्व बोधें स्वस्थ हो ॥ ४५ ॥

मी वेगळा जन वेगळें । ऐसें न जया कांहीं निराळें ॥
अखंडैक रस पूर्ण जें भरलें । दुजें न उरलें तयातें ॥ ४६ ॥

नामरूप कार्य करणें । या सर्व उपाधी समजणें ॥
नानात्व सर्वथैव त्यजणें । ब्रह्म होणें तें हेंच ॥ ४७ ॥

मीच एक अवघा पाहीं । मजवीण रिता ठाव नाहीं ॥
व्यापून अवशेष दिशा दाही । नाहींच कांहीं मदन्य ॥ ४८ ॥

हेच भावना दृढ धरावी । माया भूल दूर सारावी ॥
मजवीण नाहीं वस्तु परावी । आवरावी निजदृष्टि ॥४९॥

श्रोतया सहज येई संशय । तरी हा भेद कैसा होय ॥
जीवज्ञाता ब्रह्मज्ञेय । कोण उपाय हा जाया ॥५० ॥

भेदबुद्धि रतिप्रमाण । अनन्यत्वा पाडी खाण ॥
तात्काळ उत्पादी नानापण । जन्ममरणा कारण ॥ ५१ ॥

अविद्या तिमिर दृष्टि । लोपतां लोपे सकळ सृष्टी ॥
सस्वरूपैक भरेल दिठी । नानात्व उठाउठी पळेल ॥ ५२ ॥

शुद्धोदकीं शुद्धोदक । घालितां होतें निखळ एक ॥
पूर्वापर समरसे देख । ओळख नुरे भेदाची ॥ ५३ ॥

काष्ठाकार भिन्न भिन्न । परी तीं अग्नि स्वरूपें अभिन्न ॥
तो तो अविच्छिन्न आकारहीन । स्वयें विलीन निजरूपीं ॥ ५४ ॥

ऐसेंच आत्मैक्य विज्ञान । नलगे अन्य प्रतिपादन ॥
आत्मा सर्वांभूतीं परीपूर्ण । रूप विहीन सर्वथा ॥ ५५ ॥

विपरीत अध्यारोप निमित्त । तेणें भ्रमित सर्वदा चित्त ॥
जन्म मरणादि दुःखें अनुभवित । प्राणी दुश्चित्त सर्वथा ॥ ५६ ॥

त्यागूनि नामरूपादि उपाधी । विशुद्ध विज्ञानरूप साधी ॥
ऐशिया सिद्धास माया न बाधी । निजानंदीं रत सदा ॥ ५७ ॥

ऐशीया स्थितीचें उदाहरण । मूर्तिमंत श्रीसाईचे चरण ॥
भाग्यें लाधलें जया दर्शन । धन्य धन्य जन ऐसे ॥ ५८ ॥

चंद्र उदकीं दिसे स्थित । परी तो जैसा उदकातीत ॥
संत तैसेच भक्तपरि वेष्टित । वस्तुतः अलिप्त तयांसी ॥ ५९ ॥

दिसे जरी परिवारिला भक्तीं । परी न कोठेंही आसक्ती ॥
स्वस्वरूपीं चित्त वृत्ती । दृश्यनिवृत्ती सर्वदा ॥ ६० ॥

ऐसे हे महा साधूसंत । जयांच्या बोलांत वर्ते भगवंत ॥
कांहीं न अप्राप्य तयां विश्रांत । कांहीं न अज्ञात तयांतें ॥ ६१ ॥

उपदेश देती आणि घेती । ऐसें गुरु शिष्य असंख्य जगतीं ॥
परी उपदेशासवें अनुभूति । देती ज्ञातीं ते विरळा ॥ ६२ ॥

पुरे आतां हें पूर्ववर्णन । करूं मुख्य कथावतरण ॥
तदर्थी श्रोते सोत्कंठ पूर्ण । श्रवण संपन्न होवोत ॥ ६३ ॥

मोंगलाईंत नांदेड शहरीं । पारशी एक प्रख्यात व्यापारी ॥
धार्मीकलोक प्रियभारी । नेम निर्धारी रतंनजी ॥ ६४ ॥

धनसंपदेचे पसारे । गाड्या घोडे शेतें शिवारें ॥
वाडियांची मुक्तद्वारें । विन्मुख माघारे नच कोणी ॥ ६५ ॥

ऐसे बाह्यतः आनंद सागरीं । डुंबत असतां अहोरात्रीं ॥
अंतरीं दुर्धर चिंतामगरी । सदैव घेरी शेटीते ॥ ६६ ॥

हें तों ईश्वरी सूत्रचि पाहीं । निर्भेळ सौख्य नाहीं कुणाही ॥
कोणास कांहीं कोणास कांहीं । हुरहुर राही पाठीसी ॥ ६७ ॥

कोणी म्हणेल मीच मोठा । सर्वैश्वर्यें मीच लाठा ॥
घालूं लागेल उफराठा । नसता ताठा भरेल ॥ ६८ ॥

निर्व्यंगत्वा लागेल दृष्ट । लवव्यंगत्वाचें गालबोट ॥
परमेष्ठी स्वकरेंच फांसी यथेष्ट । ऐसे हें स्पष्ट वाटतें ॥ ६९ ॥

रतनजी धनकनक संपन्न । आलिया गेलिया घाली अन्न ॥
दीनाचें विच्छिन्न करी दैन्य । सुप्रसन्न सर्वदां ॥ ७० ॥

एवं शेटजी सुखांत होते । घेतले जरी हें जगाचिया चित्तें ॥
तरी विचाराचें सौख्य विफल तें । पुत्रही नातें सर्वथा ॥ ७१ ॥

कन्या संपत्तीचा पसारा । एका मागून एक वारा ॥
फोडूनि लाभेल त्याचा वारा । मनासी थारा कैंचा त्या ॥७२॥

१ रतनजी शापूरजी वाडिया मिलकांट्राक्टर नांदेड

प्रेमावीण हरिकीर्तन । ताल स्वरावीण गायन ॥
यज्ञोपवीतावीण ब्राह्मण । शोभा कवण तयाची ॥ ७३ ॥

आहे सकल कलाप्रवीण । नाहीं सारासार ज्ञान ॥
भूतदयाहीन आचारसंपन्न ॥ शोभा कवण तयाची ॥ ७४ ॥

भाळीं टिळे गोपी चंदन । गळां तुळसी माळा भूषण ॥
जिव्हा करी संत विडंबन । शोभा कवण तयाची ॥ ७५ ॥

अनुतापावीण तीर्थाटन । गळसरीवीण अलंकरण ॥
पुत्रावीण गृहस्थसदन । शोभा कवण तयाची ॥ ७६ ॥

एक तरी सुपुत्र संतान । देईल काय नारायण ॥
हेंच तया अनुदिन चिंतन । निश्चिंत मन होईना ॥ ७७ ॥

तेणें शेटजी सदा खिन्न । गोड न लागे अन्नपान ॥
मनीं रात्रंदिन उद्विग्न । चिंतामग्न सर्वदा ॥ ७८ ॥

देवा माझा एवढा कलंक । धुवूनी कीजे मज निष्कलंक ॥
देई वंशा आधार एक । लज्जा राख प्रभुराया ॥ ७९ ॥

दासगणूवर मोठी भक्ति । जीवींचे हार्द तयां निवेदिती ॥
ते ह्मणती जा शिरडीप्रती । मनेप्सित पावशी ॥ ८० ॥

घेई बाबांचें दर्शन । चरण तयांचें वंदून ॥
करी साद्यंत गुह्य निवेदन । आशिर्वचन देतील ॥ ८१ ॥

जा होईल तुझें कल्याण । अतर्क्य बाबांचें विंदान ॥
जाई तयांसीं अनन्य शरण । कृत कल्याण होशील ॥ ८२ ॥

मनास मानवला विचार । रतनजीचा झाला निर्धार ॥
कांहीं दिन लोटलियावर । पातले शिरडीवर रतजनी ॥ ८३ ॥

गेले दर्शना मशीदीसीं घातलें लोटांगण साईपदाशीं ॥
पाहोनि महाराज पुण्यराशी । प्रेम तयांशीं लोटलें ॥ ८४ ॥
करंड फुलांचा सोडिला । सुमन हार काढून घेतला ॥
प्रेमें बाबांच्या गळां घातला । फलभार समर्पिला चरणांते ॥८५॥
होऊनिया अति विनीत ॥ रतनजी अत्यादरयुक्त ॥
बाबापाशीं जाऊन बैसत । प्रार्थना करीत ती परिसा ॥ ८६ ॥
जन पडतां महत्संकटीं । येती अपुल्या पायां निकटी ॥
बाबा रक्षिती उठाउठी । म्यां हे गोष्टी ऐकिली ॥ ८७ ॥
म्हणोन इथवर आलों भेटी । धरोनि मोठी उत्कंठा पोटीं ॥
सादर करितों चरण संपुटीं । परता न लोटी महाराजा ॥ ८८ ॥
मग म्हणती बाबा तयांसीं । येतां येतां आज येसी ॥
दे काय मज दक्षिणा देशी । मग तूं होशी कृतार्थ ॥ ८९ ॥
येतां कोणीही दर्शनासीं । लागतां चरण वंदावयासीं ॥
असो हिंदू यवन वा पारसी । दक्षिणा त्यापासीं मागत ॥९०॥
ती तरी काय थोडी थोकडी । रुपये एक दोन वा पंचकडी ॥
मागत शत सहस्त्र लक्ष कोडी । स्वेच्छा परवडी दक्षिणा ॥९१॥
दिधली तरी आणिक आणा । संपली म्हणतां उसनी घ्याना ॥
जेव्हां कोठें उसनीही मिळेना । तेव्हां मग याचना थांबवित ॥९२॥
आणीक तयां भक्तां म्हणत । फिकीर न करी जा यत्किंचित ॥
देईन तुजला रुपये मी मस्त । बैस तूं निश्चिंत मजपाशीं ॥ ९३ ॥
दुनियेमे किसीका कोई है । और किसीका कोई है ॥
अपना तो यहां कोई नहीं है । अपना अल्लाही अल्ला है ॥ ९४ ।

करी जो मज जीव प्राण । ऐसियाचीच मज वाण ॥
तो देतां मज एक गुण । देतों मी शत गुण तयासीं ॥ ९५ ॥
असेना मोठा लक्षाधीश । तयासही दक्षिणा मागावयास ॥
निर्धना घरीं जावयास । करीत आज्ञेस महाराज ॥ ९६ ॥
मोठा धनाढ्य अथवा रंक । गरीब दुर्बळ अथवा खंक ॥
एक उणा वा एक अधिक । नाहीं ठाऊक साईस ॥ ९७ ॥
वंदूनि या आज्ञा शिरीं । निरभिमान होऊनि अंतरीं ॥
बाबालागी याचना करी । जाऊन घरीं गरीबाच्या ॥ ९८ ॥
तरी या पोटीं हाच सारांश । दक्षिणेचें करूनि मिप ॥
बाबा शिकवीत निजभक्तांस । वरावयास सलीनता ॥ ९९ ॥
उपजेल कोणासही ऐसी शंका । साधूस तों पाहिजे धन कां ॥
यदर्थी विचार करितां निका । फिटेल आशंका मनाची ॥ १००।
साई जरी पूर्णकाम । दक्षिणेचें काय काम ॥
कैसा असेल तो निष्काम । भक्तांसी दाम मागे जों ॥ १०१ ॥
जयास गारा आणि हिरा । ताम्र नाणें वा स्वर्ण मोहरा ॥
एकाच परि माणाचा विकरा । तो कां निजकरा पसरी तो ॥१०
उदर पूर्त्यर्थ मागती भिक्षा । वैराग्याची वरिली दीक्षा ॥
तया विरक्ता निरपेक्षा । काय अपेक्षा दक्षिणेची ॥ १०३ ॥
अष्ट सिद्धि जोडल्या करीं । जयाचे सदां तिष्ठती द्वारीं ॥
नवनिधी जयाचे आज्ञाधारी । तयाकांलाचारी द्रव्यार्थ ॥ १०४ ।
ऐहिकावरी मारूनि लाथ । आमुष्मिका नदुंकूनि पहात ॥
ऐसे जे सम्यग्दर्शी विरक्त। धन किमर्थ तयांना ॥ १०५ ॥

जे संत साधू सज्जन । जे उत्तम श्लोकपरायण ॥
भक्तकल्याणार्थ जयांचें जीवन । तयांस धन कां व्हावें ॥ १०६ ॥

साधूस किमर्थ व्हावी दक्षिणा । तयांनीं असावें निरीच्छ मना ॥
फकीर होऊनि लोभ सुटेना । नित्य आराधना पैशाची ॥ १०७॥

प्रथम दर्शना घेती दक्षिणा । पुनर्दर्शना मागती दक्षिणा ॥
निरोप घेतां आणा दक्षिणा । क्षणोक्षणीं हें काय ॥ १०८ ॥

आधीं पानीय उत्तरा पोशन । पुढें हस्त. मुख–प्रक्षालन ॥ .
करोद्वर्तन तांबूल दान । तयामागून दक्षिणा ॥ १०९ ॥

परी बाबांचा क्रम विलक्षण । करूं जातांच चंदन विलेपन ॥
किंवा अक्षताद्यलंकरण । दक्षिणा प्रदान कांक्षिती ॥ ११० ॥

आरंभितांच पूर्वाराधना । बाबा आधींच मागती दक्षिणा ॥
ॐ० तत्सब्द्ब्रह्मार्पणा । तत्क्षणाच करणें ये ॥ १११ ॥

तरी या शंकेचें निरसन । कराया न लगे महाप्रयत्न ॥
होतां क्षणैक दत्तावधान । समाधान लाधाल ॥ ११२ ॥

धनाचा जो करणे संचय । धर्म धडावा हाचि आशय ॥
परी क्षुल्लक काम आणि विषय । यांतचि अतिशय वेंचे तें ॥ ११३॥

धनापासाव धर्म घडे । धर्मापासाव ज्ञान जोडे ॥
स्वार्थ तरी तो परमार्थी चढे । मना आतुडे समाधान ॥११४॥

आरंभीं बहुत कालपर्यंत । बाबा कांहींही नव्हते घेत ।
जळक्या कांड्यांचा संग्रह करीत । तोच कीं भरीत खिशांत ॥११५॥

असो भक्त वा अभक्त ॥ कोणाहीपाशीं कांहीं न मागत ॥
दिडकी दुगाणी ठेविल्या तेथ । तमाखू आणात वा तेल ॥ ११६ ॥

तंबाखूचें फार प्रेम । ओढीत विडी अथवा चिलीम ॥
त्या चिलिमीची सेवाही निःसीम । बहुधा निर्धूम नसेती ॥११७॥
पुढें आलें कोणाचे मना । रिक्त हस्तें दक्षिणे विना ॥
जावें कैसें संत दर्शना । तदर्थ दक्षिणा ते घेत ॥ ११८ ॥
दिडकी दिधल्या घालीत खिसां । ठेवितां कोणी ढबू पैसा ॥
परत करीत जैसाचा तैसा । क्रम हा ऐसा बहुकाळ ॥ ११९ ॥
परी पुढे कांहीं कालें । साईबाबांचें महात्म्य वाढलें ॥
भक्तांचे थवे येऊं लागले । पूजन चाललें विधीपूर्वक ॥ १२० ॥
नाहीं पूजेची सांगता जाण । सुवर्ण–पुष्प–दक्षिणेवीण ॥
हें तो नित्य पूजेचें विधान । पूजकां प्रमाण ठाउकें ॥ १२१ ॥
राज्याभिषेक सिंचना । अथवा संपादितां पदपूजना ॥
पूजक आणिती उपायना । तैसीच दक्षिणा गुरुपूजे ॥ १२२ ॥
उच्चांदिवि दक्षिणावंत । हिरण्यदा अमृतत्वं भजंत ॥
हेम दाता शुद्धिमंत । मंत्रवर्णांत हें वचन ॥ १२३ ॥
सौमंगल्य गंध दानें । आयुष्य वर्धन अक्षतेनें ॥
श्री ऐश्वर्य पुष्प तांबूलार्पणें । दक्षिणेनें बहु धनता ॥ १२४ ॥
गंधाक्षत पुष्प तांबूल । पूजा द्रव्यांत जैसें मूल ॥
तैसीच दक्षिणा सुवर्ण फूल । बहुधन फल वितरिते ॥ १२५ ॥
दक्षिणा लागे देवता पूजनी । तैसीच तत्सांगता सिध्यर्थ जनीं ॥
व्रतोद्यापन वायन दानीं । हिरण्य लागे अर्पाया ॥ १२६ ॥

---

१ उच्चस्थानस्थित २ दक्षिणा देणारे ३ सुवर्णदान देणारे ४ ज्ञानदान ५ चित्तशुद्धवान ६ वेदाचा एक भाग.

जगाची ही घडामोड । पैशावरीच सारी मोड ॥
अग्रू नुकसानीचीही फेड । फेडितावही पैशाने ॥ १२७ ॥
हिरण्यगर्भ गर्भस्थ । इत्यादिमंत्र उच्चारित ॥
देव पूजेसही दक्षिणा संमत । संत पूजनींच कां नको ॥ १२८ ॥
संतदर्शना जातां । आपापुल्या ज्ञानानुसारता ॥
येतें कोणाच्या काय चित्ता । एक वाक्यता दुर्मीळ ॥ १२९ ॥
भजन भावार्थ कोणा मनी । कोणी संत परिक्षेलागुनी ॥
कोणी म्हणे मनींचे सांगुनी । देईल जनीं तो संत ॥ १३० ॥
कोणी प्रार्थिती दीर्घायुता । हस्ति हिरण्य संपत्ति मत्ता ॥
कोणी पुत्र पौत्रवत्ता । अखंडित सत्ता मागती ॥१३१॥
नवल बाबांची अगाध शैली । जावोत कोणी कराया कुटाळीं ॥
दुर्बुद्धीची होऊनि होळी । चरण कमळीं विनटत ॥ १३२ ॥
हें ही भाग्य नसलिया संचितीं । अनुताप तरी पावत चित्तीं ॥
होऊनि निरभिमान निश्चिती । दृढ प्रचीतीं पावत ॥ १३३ ॥
हेतो सर्व प्राकृत भक्त । सर्वथैव प्रपंचा सक्त ॥
दक्षिणादानें शुद्ध चित्त । व्हावेत हें मनोगत बाबांचें ॥ १३४ ॥
"यज्ञेन दानेन तपसा" ही श्रुती । आत्मज्ञानो त्सुका ही प्रती ॥
दक्षिणाप्रदान साधन युक्ती । स्पष्ट वचनोक्ति सांगतें ॥ १३५ ॥
भक्त स्वार्थी वा परमार्थी । दोघांस व्हावी इष्ट प्राप्ती ॥
तरी दक्षिणा निजगुरूप्रती । निजहितार्थी द्यावी कीं ॥ १३६ ॥
प्रजापती ही देवांदैत्यां । मानवांसकट तीन अपत्यां ॥
ब्रह्मचर्यवास संपतां । उपदेश मागतां हेंच वदे ॥ १३७ ॥

"द" हा एकाक्षर उपदेश केला। काय एणें बोध झाला ॥
तोही विचारूनि दृढ केला। अभिनव लीला गुरुशिष्य ॥ १३८ ॥
'दांत व्हावें' देव समजले। 'दया करा' असुर समजले ॥
'दान' द्यावें मानव समजले। प्रजापति 'भलें भलें' म्हणे ॥१३९॥
देव नव्हेत कोणी अन्य। मानवचि परी स्वभावें भिन्न ॥
अदांत उत्तम गुण संपन्न। देव हें अभिधान तयांचे ॥ १४० ॥
मानवांमाजीच आहेत असुर। जे हिंसापर दुष्टक्रूर ॥
मानवां मांजी लोभ दुर्धर। एवं त्रि प्रकार मानव ॥ १४१ ॥
तरी लोभ प्रधान नर। लोभ गर्तेंतून काढावया वर ॥
भक्त हितेच्छा ओढवी कर। कृपासागर साईनाथ ॥ १४२ ॥
तैत्तिरीयोपनिषदनुवाक। एकादशीं श्रुतीही देख ॥
दान प्रकार आज्ञापी अनेक। त्यांतील प्रत्येक परिसावा ॥१४३॥
देणें नित्य श्रद्धेनें द्यावें। विना श्रद्धा दिधलें न पावे ॥
राजाज्ञे शास्त्राज्ञे भ्यावें। लज्जेनें द्यावें कांहींतरी ॥ १४४ ॥
विवाहादि लोकाचार। तेथेंही देणें लागे अहेर ॥
देऊन राखावा मित्राचार। लोक व्यवहार शिक्षा ही ॥१४५॥
बाबाही दकारें भक्तांप्रत। भक्तहितार्थ तेंच मागत ॥
करा दया दान व्हादांत। सौख्य अत्यंत लाधाल ॥ १४६ ॥
अदांतत्वादि दोषत्रय। करावया हा त्रिदोष क्षय ॥
हा एकाक्षर स्वल्प उपाय। शिष्यार्थ गुरुराय योजिती ॥१४७॥

---

बृहदारण्यक अ० ५ ब्रा० २.

काम क्रोध आणि लोभ । आत्मोन्नतीलागीं अशुभ ॥
तयांचा जय अति दुर्लभ । यदर्थ सुलभ उपाय हा ॥१४८॥

जैसी ही श्रुती[1] तैसीच स्मृती । तियेचीही ऐसीच अनुमती ॥
तियेचें अवतरण श्रोतयांप्रती । दृढ प्रतीत्यर्थ देतसें ॥ १४९ ॥

त्रिविधं नरयस्येदं द्वारंनाशनमात्मनः
कामः क्रोधस्तथालोभस्तस्मादेतत्रयंत्यजेत्

श्री मद्भगवद्गीता अ. १६ श्लो. २१

काम क्रोध लोभ जाण । हीं नरकाचीं द्वारें तीन ॥
यांचे पायीं आत्मविनाशन । यदर्थ निक्षून त्यागावे ॥ १५० ॥

परम दयाळू साई समर्थ । साधावया भक्त हितार्थ ॥
तयांलागीं दक्षिणा मागत । शिक्षणही देत त्यागाचें ॥ १५१ ॥

दक्षिणेची काय किंमत । साधावया गुरुवचनार्थ ॥
प्राणही द्यावया नाहीं जो उद्यत । तयाचा परमार्थ कायसा ॥१५२।

खरेंच भक्तकल्याणावीण । बाबांस काय दक्षिणेचें कारण ॥
स्वयें तयांचें नव्हतें जीवन । अवलंबून दक्षिणेवरी ॥ १५३ ॥

पोटासाठीं भिक्षा मागत । दक्षिणेपोटीं नव्हता स्वार्थ ॥
दक्षिणादानें शुद्धचित्त । व्हावेत निजभक्त हाहेत ॥ १५४ ॥

उपरि निर्दिष्ट वेदवचन । तदनुसार दक्षिणाप्रदान ॥
आधीं घडवून आणिल्यावाचून । न घडे पूजन संपूर्ण ॥ १५५ ॥

---

१ बृहदारण्यकोपनिषद्भाष्यपंचमाध्याय, द्वितीय ब्राह्मण (श्रीमच्छंकराचार्य)

पुरें आतां हा दक्षिणा ग्रंथ । विशद झाला तन्मथितार्थ ॥
नाहीं अभिलाष नास्वार्थ । भक्त स्वहितार्थ दक्षिणा ॥ १५६ ॥

ह्मणून आतां कथाभाग । पुढें निवेदूं यथासांग ॥
ऐका रतनजी दक्षिणा प्रसंग । कौतूक चांग साईचें ॥ १५७ ॥

श्रोतीं पूर्ण कृपा पूर्वक । परिसिजे हें अद्‌भुत कथानक ॥
साई स्वरूप कैसें व्यापक । कैसें अलोलिक देखिजे ॥ १५८ ॥

शेटीपासीं दक्षिणा मागतां । साई कथिती पूर्व वृत्तांता ॥
परी तो नाठवे शेटीचें चित्ता । वाटली विस्मयता तयांस ॥१५९॥

तीन रुपये चौदा आणे । त्वां मज दिधले ते मी जाणें ॥
बाकी जे आणिले मजकारणें । ते मज दक्षिणे देई गा ॥ १६० ॥

हेंच बाबांचं प्रथम दर्शन । ऐकून बाबांचें हें वचन ॥
रतनजी शेट विस्मयापन्न । करूं स्मरण लागती ॥ १६१ ॥

शिरडीस पूर्वी आलों नाहीं । कोणासवें न पाठविलें कांहीं ॥
ऐसें असतां आश्चर्य पाही । महाराज साई वदती हे ॥ १६२ ॥

नाहींच ऐसें कधीं घडले । रतनजी मनीं बहु अवघडले ॥
दक्षिणा दिधली पायां पडले । तयां नुलगडलें तें कोडें ॥ १६३ ॥

तें तितुकेंच राहून गेलें । प्रयोजन येण्याचें निवेदन केलें ॥
पुनश्च पायीं लोटांगण घातलें । जोडून बैसले निजहस्त ॥ १६४ ॥

शेटजी मनीं बहु धाले । ह्मणती बाबा बरें केलें ॥
पूर्व भाग्य उदया आलें । दर्शन झालें पायाचें ॥ १६५ ॥

मी दुर्दैवी अल्पज्ञ । नेणें पूजा अर्चा यज्ञ ॥
विधिवशें हें त्रिकालज्ञ । प्राज्ञ दर्शन घडलें कीं ॥१६६॥

आपण जाणवां माझी चिंता । करा दूर ती कृपावंता ॥
लोटूं नका या अनन्य भक्ता । पाया परता दयाळा ॥ १६७॥
दया उपजली साईनाथा । म्हणती चिंता न करी वृथा ॥
तव नष्टचर्या येथून आतां । पाया उतरता लागला ॥१६८॥
प्रसाद उदीचा हातीं दिला । कृपेचा कर शिरीं ठेविला ॥
मनाची मुराद पुरवील अल्ला । आशिर्वाद दिधला शेटीस ॥१६९॥
मग आज्ञापन घेतलें । रतनजी परतोन नांदेडा आले ॥
जें जें जैसें जैसें घडलें । सविस्तर कथिलें गणुदासा ॥१७०॥
यथायोग्य झालें दर्शन । आनंद निर्भर झालें मन ॥
प्रसादपूर्वक आश्वासन । आशिर्वचन पावलों ॥१७१॥
यथास्थित सर्व झालें । परी एक नाहीं मज समजलें ॥
महाराज हें काय वदले । कांहींही नुमजलें मजलागीं ॥१७२॥
"तीन रुपये चवदा आणे । त्वां मज दिले ते मी जाणें" ॥
बाबांचें हें काय बोलणें । सांगा स्पष्टपणें मज सारें ॥१७३॥
कुठले रुपये कुठले आणे । कुठून पूर्वी घडेल देणें ॥
यांतील इंगित कांहींच नेणें । प्रथमचि जाणें शिर्डीचें ॥१७४॥
मज तो कांहीं उकल न पडे । भासे मज हे गूढ रोकडें ॥
दुर्बोध केवळ हें मज कोडें । आपणा उलगडे तरी का ॥ १७५ ॥
हा तरी एक चमत्कार । दास गणू करिती विचार ॥
काय असावें यांतील सार । मनाचा निर्धार होईना ॥ १७६ ॥
आठवे पूर्ण विचारांतीं ॥ एक अवलियाची मूर्ति ॥
मौली साहेब जया वदती । आठवली चित्तीं बुवांच्या ॥ १७७ ॥

जातीचे हे मुसलमान । कार्यक्रम संता समान ॥
धंदा हमालीचा करून । मालकाधीन वर्तती ॥ १७८ ॥

यांचें चरित्र सविस्तर देतां । विषयांतर होईल ग्रंथा ॥
मौली साहेब चरित्र कथा । ठावी समस्तां नांदेडीं ॥ १७९ ॥

शिरडीस जाणें ठरल्यावरी । मौली साहेब यांची फेरी ॥
सहज शेटजीचे घरीं । स्वेच्छाचारी जाहली ॥ १८० ॥

तयां उभयतां परस्पर । प्रेम होतें अपरंपार ॥
फळपान सुमन हार । यथोपचार अर्पिले ॥ १८१ ॥

शेटजीस होऊनि प्रेरणा । दिधला मौलींस छोटाखाना ॥
तेथील खर्चाची कल्पना । स्मरली तत्क्षणा गणु दासा ॥ १८२ ॥

खर्चाची यादी आणवीली । पईन पई सर्वही धरली ॥
तयांची मग एकंदर केली । बेरीज झाली बरोबर ॥ १८३ ॥

तीन रुपये चौदाच आणे । तंतोतंत अधिक ना उणें ॥
तयाची पावती बाबांनीं देणें । आश्चर्य बहु गुणें सर्वत्रां ॥ १८४ ॥

साई महाराज ज्ञानराशी । जाणें बैसोनियां मशिदीसी ॥
भूत भविष्य वर्तमानाशीं । कवण्याही देशीं घडो तें ॥ १८५ ॥

भूत मात्रीं एकात्मता । असल्यियावीण साईसमर्था ॥
यईल कां हा प्रकार अनुभवितां । अथवा सांगतां दुजियातें ॥ १८६ ॥

शिरडीपासून नांदेड दूर । दोहींमध्यें महदंतर ॥
अनोळख हे संत परस्पर । साईसही तार यावी कसी ॥ १८७ ॥

साईमहाराज तो मी एक । मौली बुवा कोणी आणिक ॥
अभेद बुद्धीचा हा विवेक । नाहीं अनेकत्व उभयांत ॥ १८८ ॥

ब्रह्मीभूत श्रीसंत मौलीसाहेब ( नांदेड ).



मौली गुरांचा सोम आत्मा । असे सर्वांचा सर्वांतरात्मा ॥
परी या एकात्म्यतेच्या धर्मा । धन्य त्या मर्मा जाणे तो ॥१८९॥

बाह्य देहें जरी वियुक्त । अंतरीं दोघे नित्य युक्त ॥
ते दोघेही वाणीही अयुक्त । कधींही विभक्त नव्हते ॥ १९० ॥

त्या दोघांचे एकज्ञान । एकप्राण एक अनुसंधान ॥
दोघेही एक चैतन्य घन । समसमान वृत्तीनें ॥ १९१ ॥

शिरडी नांदेडीं महदंतर । त्या दोघांचें एक अंतर ॥
एक प्राण एक शरीर । तेणें ही तार परस्पर ॥ १९२ ॥

काय नवल हें साधुसंत । तारायंत्रें ताराराहित ॥
कुठें कांहींही घडो सृष्टींत । साद्यंत अवगत तयांतें ॥ १९३ ॥

पुढें योग्य काळ लोटला । रतनजीस देव पावला ॥
स्त्रियेस त्यांच्या गर्भ राहिला । वृक्ष पालवला आशेचा ॥१९४॥

सुवेळीं कुटुंब बाळंत झालें । आशिर्वचन सत्य झालें ॥
पुत्र रत्न पोटीं आलें । आनंदले रतनजी ॥ १९५ ॥

पडतां बहुसाळ आवर्षण । व्हावें अवचट पर्जन्यवर्षण ॥
तैसे हे शेटजी निवाले पूर्ण । पुत्र संतान प्राप्तीनें ॥ १९६ ॥

पुढें तो वंशवेल जो फुलला । यथाक्रम विस्तारत गेला ॥
कन्या पुत्रीं सुखें डवरला । सौख्य लाधले रतनजी ॥ १९७ ॥

---

१ मन

( २ ) रावबहादूर हरि विनायक साठे शिर्डीस कसे गेले हें दासगणूंनें आपल्या अर्वाचीन भक्तलीलामृताचे एकविसाव्या अध्यायांत सांगितलें आहे. त्यावेळीं महाराजांनी त्यांना आशिर्वाद दिला होता. " तुं त्व

पुढें ही जात साई दर्शना । पावूनि तयांच्या आशिर्वचना ॥
पुर्ण जाहल्या मन कामना । तुष्टले मना रतनजी ॥ १९८ ॥

वसंतीं जरी आम्रसुफलित। सर्वचि फळें पक्क न होत ॥
बारा मुलांत चार हयात। सुखें नांदत सांप्रत ॥ १९९ ॥

यदृच्छेनें जें जें घडावें। त्यांतचि ज्याचें चित्तसुखावे ॥
ऐसे रतजनी गोड स्वभावें । खेद न पावले तिळभर ॥ २०० ॥

आतां पुढील कथेचें सार । साईनें भरलें स्थिरचर ॥
कोणीही कुठेंही बैसूनि स्थिर । घ्यावा साचार अनुभव ॥ २०१ ॥

ठाणे शहरचा एक गरीब लाचार । उपनाव जयाचें चोळकर ॥
कैसे तयाच्या भावार्थावर। जाहले गुरुवर प्रसन्न ॥ २०२ ॥

पूर्वी कधीं न पाहिलें देखिलें। तया साईस कैसें नवसिलें ॥
कैसे तयांचे मनोरथ पुरले। अनुभव दिधले कैसे त्या ॥ २०३ ॥

कायसें भजन प्रेमावीण। वाचणें पोथी अर्थावीण ॥
देव कैंचा भावावीण। अवघा शीण तो सारा ॥ २०४ ॥

कुंकुम तिळकावीण भाळ। अनुभवावीण ज्ञान फोल ॥
नाहीं हे पुस्तकीं विद्येचे बोल। अनुभवें तोल करावे ॥ २०५ ॥

---

कर, तुला मुलगा होईल " त्याप्रमाणें साठयांनी लग्न केलें कांही दिवसांनी त्यांचें कुटुंब गर्भार राहिलें. पण मुलगा न होतां मुलगी झाली. अर्थात साठयांचा फार हिरमोड झाला. नंतर त्यांचें कुटुंब दुसऱ्यानदां गर्भार राहिलें, तें व्हांही मुलगीच झाली. अर्थात् साठे फारच उदास झाले, पण महाराजांचा आशिर्वाद वायां गेला नाहीं. साठयांचें कुटुंब तिसऱ्यांदां गर्भार होऊन मुलगा झाला व तो मुलगा महाराजांच्या कृपेनें सुखरूप आहे.

किमर्थ हा प्रबंध साईलीला । अनुबंध याचा ठावा न मजला ॥
मजकरवीं जो साईनीं लिहिविला । ठावें तयांलाच प्रयोजन ॥२०६॥

शिवाय ग्रंथास लागे अधिकारी । मी तो साईची करितों चाकरी ॥
तयांची ही दफतरदारी । आज्ञाधारी तयांचा ॥ २०७ ॥

श्रोते चातक तृषाकीर्ण । साई समर्थ स्वानंदघन ॥
वर्षे अगाध कथा जीवन । तृषा शमन करावया ॥ २०८ ॥

जिया सत्तेनें हे वाणी । जयांचे हें चरित्र वर्णी ॥
तयांचिया पदरजकणीं । घेऊ लोळणी हे काया ॥ २०९ ॥

तोच या वाचेचा प्रवर्तविता । तोच निज कथेचा कथयिता ॥
त्याचेच पायीं होवो स्थिरता । चंचल चित्ता माझिया ॥ २१० ॥

जैसें हें कायिक आणि वाचिक । तैसेंच भजन हें मानसिक ॥
घडो मज अक्षय सुख दायक । दीन मी पाईक साईंचा ॥ २११॥

चरित्र वदता आणि वदविता । जरी साईच नटला तत्वता ॥
तरी काय भिन्नतच्छ्रोता । तोही न परता साईविण ॥ २१२ ॥

दिसाया दिसे चरित्र केवळ । परी हा सकळ साईचा खेळ ॥
स्वयेंच होऊनि खेळिया प्रेमळ । खेळ हा प्रबळ मांडिला ॥ २१३ ॥

अगाध साईबाबा चरित्र । भक्तांसी अनुभव दावूनि विचित्र ॥
करूनि मजला निमित्त मात्र । तुष्टवीत निजछात्र समुदाय ॥२१४॥

चरित्र नव्हे हा सुखाचा ठेवा । निज परमामृताचा मेवा ॥
भाग्यें आगळा तेणेंच सेवावा । भक्तिभावा करोनी ॥

नवल गुरुकृपेचा महिमा । स्मरण रहावें भक्तां आम्हां ॥
म्हणवूनिया ग्रंथ परिश्रमा । भक्त विश्रामार्थ सेविले ॥ २१५ ॥

आवडी हें चरित्र गातां । उल्लसेल श्रवणासंपन्नता ॥
कथानु वृत्यनुवादें भक्ता । भक्ति प्रेमळता वाढेल ॥

श्रवण करितां रात्रंदिन । तुटेल माया मोहबंधन ॥
निरसेल त्रिपुटीचें भान । सुखसंपन्न श्रोतेजन ॥ २१६ ॥

धरूनि श्री साईचरण । हेमाड अनन्य भावें शरण ॥
विसंबूं न पवे एकही क्षण । पायींच लोटांगण अखंड ॥ २१७ ॥

स्वस्ति श्री संतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्रीसाईसमर्थ सच्चरिते । रतनजी साई समागम
नाम चतुर्दशोऽध्यायः॥ २१८ ॥

॥ श्री सद्गुरु साईनाथार्पणमस्तु । शुभं भवतु ॥



# श्रीसाईनाथ भजनमाला.

## सुधारून वाढविलेली आवृत्ति.

मालेचे कर्ते रा. रघुनाथराव तेंडुलकर यांच्या निधनानंतर आतां मालेची पुनरावृत्ती छापविणें नाहीं. साईभक्तांनीं माला मागविण्याची त्वरा करावी, कारण प्रती फारच थोड्या शिल्लक राहिल्या आहेत.

सावित्रीबाई तेंडुलकर.

माला मिळण्याचा पत्ता:—

श्रीमति सावित्रीबाई तेंडुलकर,

रंगाऱ्याची चाळ, बांद्रें.

बी. बी. सी. आय. रेल्वे.

---

# आख्यान-रत्न-माला, नांदेड.

या मालेंत अर्वाचीन कवींनीं रचलेलीं कीर्तनोपयोगी आख्यानें दिलीं जातील. ह. भ. प. संतकवी दासगणू महाराजांचीही प्रेमळ व प्रासादिक आख्यानें येतील.

वर्षांतून सहा पुस्तकें निघतील. पुस्तकाचा आकार डेमी अष्टपत्री, पृष्ठ सं. ४८ प्र. गु. कि. ८ आणे.

एक रुपया प्रवेश फी भरणारास पाउणकिंमतींत पुस्तक मिळेल. एकदम सहा पुस्तकांची कि. प्र. फीसह ३। रु.

ग. अ. सराफ नांदेड.

शिर्डी येथील

श्री सद्गुरु

# साईनाथ सगुणोपासना.

हें पुस्तक मूळ वे० सं० कृ० जा० भीष्म यांनीं शके १८३३ त तयार केलें होतें. सांप्रत त्याची सुधारून वाढविलेली नवीन आवृत्ती छापण्यांत आली आहे.

श्रीसमर्थ साईनाथ महाराज यांच्या त्रिकाल आरतीचे वेळीं म्हटली जाणारी पदें, व भजनकाळीं म्हणावयाजोगीं सदर शास्त्री भीष्म यांनीं तयार केलेली पदें, पदपूजा व मानसपूजा यांचा या लहानशा पुस्तकांत संग्रह केला आहे. पुस्तकाची किंमत दोन आणे ठेविली आहे.

हरि सीताराम दीक्षित

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण—श्री साईलीला ऑफीस.

रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोलकर.

५ टर्नर रोड, बांद्रे.

चिटणीस श्री शिर्डी संस्थान कमिटी

शिर्डी, ता. राहते, जि. अहमदनगर

---

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ४०२ ठाकुरद्वार, मुंबई
येथें अनंत आत्माराम मोरमकर यांनी छापून
रा. आ. तर्खड यांनीं ५ टर्नर रोड बांद्रे येथें
प्रसिद्ध केलें.